आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, ११ मे २०२३



जीवेत शरदः शतम्

# शैक्षणिक क्रांतीला चालना देणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व श्री. चंदुलालजी बियाणी

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात शैक्षणिक क्रांतीला चालना देणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व श्री. चंदुलालजी बियाणी परळी वैजनाथ हे शहर बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग. वैद्यनाथ प्रभूंचे अधिष्ठान असल्याने धार्मिक, तर वीजनिर्मितीच्या माध्यमातून ऊर्जा देणारे शक्तीकेंद्र आहे. राज्याच्या राजकारणात नेहमीच परळी शहर केंद्रस्थानी राहिले असून या शहरात काम करीत असताना चंदुलाल बियाणी हे आपल्या आगळ्या-वेगळ्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक कार्यातून सदैव लक्षवेधी ठरलेले आहेत. श्री. चंदुलालजी बियाणी यांचा ११ मे रोजी वाढदिवस असून त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...**


परळी शहराचे समाजकारण, अर्थकारण, राजकारण, उद्योग, क्रीडा, सांस्कृतिक, साहित्य, अशा क्षेत्राबरोबरच चंदुलाल (चंदूसेठ) बियाणी यांनी शिक्षण क्षेत्रातही आपल्या अलौकिक कार्याचा ठसा उमटवला आहे. आता परळी हे शहर शिक्षणाचे केंद्र म्हणून नावारूपास येत आहे. दै. मराठवाडा साथीचे मुख्य संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी यांच्या पत्रकारितेसोबतच सार्वजनिक कार्याचा आदर्श समोर ठेवून त्यांच्या पावलावर पाउल ठेवण्याचे काम चंदुलाल बियाणी करत आहेत. परळी शहरात शैक्षणिक दर्जा निर्माण होऊन गुणवंत विद्यार्थी घडावेत यासाठी त्यांनी प्रारंभी राजस्थानी चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून बचपन प्ले स्कूल, पोदार लर्न स्कूल आणि मागील दोन वर्षांपासून कोटा येथील नामांकित बन्सल क्लासेसचे शैक्षणिक संस्थारूपी रोपटे परळी शहरात लावले. आता या 'बन्सल क्लासेस' रूपी रोपट्याचा वटवृक्ष झाला आहे. बन्सल क्लासेस महाराष्ट्र राज्याचे मुख्य प्रवर्तक श्री. चंदूलाल बियाणी यांनी विद्यार्थ्यांच्या बाबतीत आपली भूमिका मांडताना खूप महत्त्वाच्या मुद्द्यांना अधोरेखित केले आहे. बऱ्याच विद्यार्थ्यांना कुशाग्र बुद्धिमत्ता असूनदेखील अपेक्षित यश मिळवता येत नाही. अभ्यासाचे, परीक्षेचे नियोजन करण्यात विद्यार्थी कमी पडल्यामुळे बहुतांश विद्यार्थ्यांना यश मिळत नाही. यामध्ये पालक आणि शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम नियोजनाचे मार्गदर्शन करणे हे खूप आवश्यक आहे. पालकांनी विद्यार्थ्यांवर अपेक्षेचे ओझे न लादता, ज्या अपेक्षा ते विद्यार्थ्यांकडून करत आहेत त्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी अप्रत्यक्षरीत्या नियोजन करावे व आपल्या पाल्याला मार्गदर्शन मिळवून द्यावे. आपण निवडत असलेले विद्याकेंद्र आणि त्यांची अभ्यासक्रम नियोजनाची व शिकवण्याची पद्धत, शिस्त, सातत्य तपासून पाहणे आवश्यक आहे.

चंदूलालजी बियाणी यांनी बन्सल क्लासेससारखा पर्याय महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना देताना बन्सल क्लासेसच्या सर्व निकषांचा अभ्यास केलेला आहे. बन्सल क्लासेसची शैक्षणिक सुविधा, सातत्य, निकाल, शिकवण्याची पद्धत, अनुभवी व कौशल्यपूर्ण शिक्षकांचा समूह, उत्कृष्ट पाठ्यपुस्तके (स्टडी मटेरियल), व्यवस्थापन कौशल्य या सर्व बाबी तपासून त्यांनी महाराष्ट्रासाठी बन्सल क्लासेसचा पर्याय दिला आहे. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना राजस्थान कोटा येथे जाऊन सहज शिक्षण घेणे कठीण असल्याने बियाणी सरांनी बन्सल क्लासेसला प्रत्येक शहरात नेण्याचे ध्येय समोर ठेवले आहे. महाराष्ट्रात बन्सल क्लासेसच्या सद्यस्थितीत एकूण 40 पेक्षा जास्त शाखा त्यांनी उभ्या केल्या आहेत. तसेच २०२३ वर्षाच्या शेवटपर्यंत एकूण शंभर किंवा त्याहून अधिक शाखा ग्रामीण व शहरी स्तरावर उभा करण्याचा त्यांचा मानस आहे. आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली ज्या चाळीस शाखा यशस्विरीत्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा देत आहेत, त्या शाखांचे कार्य वाखाणण्याजोगे आहे. शिकवण्याची पद्धत, बन्सल क्लासेसचे स्टडी मटेरियल, शैक्षणिक उपक्रम, शंकानिरसन पद्धत (Doubt Session), वैयक्तिकरित्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीचे विश्लेषण व अपेक्षित प्रगतीसाठी अवलंबले जाणारे तंत्र इत्यादी कारणांमुळे आज पालक आनंदी आहेत. बन्सल क्लासेसने महाराष्ट्रात अगदी कमी कालावधीमध्ये चांगले निकाल समोर आणले आहेत. इयत्ता ५वी ते १०वी प्री-फाऊंडेशन गटातील निकाल आश्चर्यजनक आहेत. स्कॉलरशिप, नवोदय, डॉ. होमी भाभा ज्युनिअर सायंटिस्ट परीक्षा, MTSE अशा विविध राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्पर्धा परीक्षांचे बन्सल क्लासेसचे निकाल विचार करण्याजोगे आहेत. या स्पर्धा परीक्षा आणि शालेय अभ्यासक्रम यांची सांगड घालत बन्सल क्लासेस विद्यार्थ्यांना शालेय स्तरावर अभ्यासात निपुण बनवत आहे. NEET व JEE अभ्यासक्रमाला बन्सल क्लासेस "डे केअर" प्लानमध्ये शिकवते. कमीत-कमी आठ तासांचा हा डे केअर प्लान असून यामध्ये मुलांना शिकवणी वर्ग, त्यांच्या प्रश्नांचे शंका निरसन (Doubt session), स्व-अध्ययन वर्ग चालवले जातात. विद्यार्थ्यांना नवीन तंत्राद्वारे जसे की, डिजिटल बोर्ड, प्रोजेक्टर, कॉम्प्यूटर लॅब, डिजिटल नोट्स इ. संसाधने पुरविली जातात. त्यांना डेली प्रॅक्टिस प्रॉब्लेम (DPP), असाईनमेंट, वर्कशीट इ. सराव साहित्य दिले जाते. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी बॅच-कॉर्डिनेटर दिलेला आहे. तो त्या विद्यार्थ्यावर वैयक्तिकरित्या लक्ष देऊन त्याच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रयत्नशील राहतो. अकॅडेमिक हेड, शैक्षणिक समुपदेशक (एज्युकेशनल काऊन्सेलर), शिक्षक या लोकांचा समूह विद्यार्थ्यांचे अभ्यासातील दोष दूर करण्यासाठी आराखडे तयार करतात. त्या विद्यार्थ्याचा शैक्षणिक आलेख उंचावण्यासाठी हा समूह सदैव तत्पर असतो. बन्सल क्लासेसमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगती अवलोकनाला प्राधान्य दिले आहे.



विद्यार्थ्यांचे अभ्यास करण्याचे कौशल्य विकसित करून देण्याचे तंत्र बन्सल क्लासेसकडे आहे आणि त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने बन्सल क्लासेसचा पर्याय निवडणे गरजेचे आहे. भविष्यकाळातील स्पर्धा पाहून पालकांनी आपल्या पाल्यासाठी बन्सल क्लासेससारख्या कोचिंग इन्स्टिट्यूटचा विचार करणे आवश्यक आहे. NEET व JEE सारख्या परीक्षांची तयारी करून घेताना बन्सल क्लासेस आपला स्वतःचा शैक्षणिक दर्जा उच्चकोटीचा देत आहेच, परंतु इयत्ता ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी ज्या अभ्यासक्रम पद्धतीचा अवलंब बन्सल क्लासेसमध्ये केला आहे, त्यामुळे प्रत्येक विद्यार्थी हा कुठल्याही क्षेत्राची भविष्यात निवड करू देत, त्यांना त्या क्षेत्रात प्रवेश मिळवण्यासाठी बन्सल क्लासेस शैक्षणिक यशाची शिदोरी देत आहे.

चंदुलाल बियाणी हे मारवाडी युवा मंचचे अध्यक्ष असून सोबतच विविध संस्थांशी त्यांचे अत्यंत निकटचे संबंध आहेत. जिथे म्हणून त्यांची गरज निर्माण झाली तेथे त्यांनी या संस्थांचे सोनेच केले आहे. राजस्थानी मल्टीस्टेट, पतसंस्था, सुयोग ॲक्वा, बचपन' प्ले स्कूल, पोदार लर्न स्कूल, डीएफसी, मराठवाडा साथी, पीसीएन न्युज अशा अनेक संस्था त्यांच्या माध्यमातून कार्यरत आहेत. आरोग्य मित्र महाराष्ट्र प्रदेश या संस्थेचे ते अध्यक्ष असून मसाप या संस्थेचे सुद्धा ते अध्यक्ष आहेत. जिल्हा नियोजन समिती बीडचे ते सदस्य असून मराठवाडा व्यापारी संघाचे मराठवाडा विभागप्रमुख आहेत. जिथे म्हणून काम करता येईल त्या सर्व ठिकाणी चंदुलाल बियाणी यांनी मोठे काम उभे केले आहे. मा. श्री. चंदुलाल बियाणी सर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रामध्ये बन्सल क्लासेस, क्यूरिअस किड्स या दोन मोठ्या शैक्षणिक संस्था भरारी घेत आहेत. बन्सल क्लासेस व क्यूरिअस किड्स या दोहोंशी संलग्न अनेक नोकरीच्या संधी बियाणी सर उपलब्ध करून देत आहेत. होतकरू तरुण, तरुणींनी शिक्षण क्षेत्रात काम करण्याची महत्त्वाकांक्षा ठेवलेली असेल तर त्यांनी या संस्थांसोबत पुढे येऊन काम करावे. चंदुलाल बियाणी सर यांच्या मार्गदर्शनाखाली विविध क्षेत्रांत काम करण्याची संधी तरुणांना मिळत आहे. अशा अष्टपैलू व्यक्तिमत्त्वास वाढदिवसानिमित्त माझ्या व आमच्या सर्व टीमच्या भरभरून शुभेच्छा. आदरणीय सरांना निरोगी आरोग्य लाभो ही प्रभू वैद्यनाथचरणी प्रार्थना!




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# सिंगापूरचा भाग्यविधाता - ली क्वान यू


आधुनिक केसरी

आज ते सिंगापूर टेलीकॉम्स मध्ये काम करतात. ली यांची मुलगी ली वेई लिंग ही डॉक्टर असून न्यूरॉलॉजिस्ट आहे. ली आणि त्यांचे मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनी योग्य वेळी मंत्रिमंडळातून निवृत्ती घेऊन कुशल आणि कार्यक्षम अशी नवीन पिढी तयार करून तिच्या हातात सिंगापूरच्या प्रगतीची सूत्रे सोपवली. पंतप्रधान म्हणून निवृत्त झाल्यानंतर ली यांची त्यांच्या पुढील वारसदारांनी त्यांचे मार्गदर्शन मिळावे म्हणून ' पालकमंत्री ' किंवा सल्लागार म्हणून नेमणूक केली. ली यांचा आजही सिंगापूरवासियांवर प्रचंड प्रभाव आहे. काहींच्या मते ली हे वादग्रस्त व्यक्तिमत्व होते, ते हुकूमशहा होते असे म्हटले जाते. पण काही असले तरी आजच्या प्रगत, स्वच्छ, सुंदर, भ्रष्टाचार मुक्त आणि विकसित देश म्हणून सिंगापूरच्या विकासाचे श्रेय ली



यांना द्यावेच लागेल. देशोदेशींचे नेते ली यांची भेट आणि मार्गदर्शन घेण्यासाठी येत असत. एकदा एका आफ्रिकन नेत्यांच्या शिष्टमंडळाने ली यांची भेट घेतली. त्यातील एकाने ली यांना विचारले की आमचे देश खूप मागासलेले आहेत. एके काळी सिंगापूरची देखील अशीच परिस्थिती होती. मग ही अविश्वसनीय अशी प्रगती आपण कशी साध्य केली. यावर ली यांनी दिलेले उत्तर फार सुंदर आहे. ते म्हणाले, " राष्ट्र मोठे असो वा छोटे, एकवंशीय असो वा विविध धर्मी, सागरकिनारी असो वा पर्वताच्या कुशीत लपलेले असो; जगातल्या सर्व राष्ट्रांची प्रगती व तेथील लोकांचे भवितव्य एका गोष्टीवर अवलंबून असते आणि ती म्हणजे सिंहासन ! सिंहासनावर बसणाऱ्यांवर तुमचा अंकुश आहे का ? सिंहासनाला पायऱ्या आहेत का ? आमच्या इथे उच्चपदावरील नियुक्ती होण्यासाठी अनेक कसोट्या असतात. केवळ लोकप्रियतेच्या आधारावर तुम्ही पंतप्रधान बनू शकत नाही.



## आनंदी पहाट

# लहान मुलांबरोबर मैत्रीपूर्ण नातं असावं

आधुनिक केसरी

कडक शिस्तीने वाढवलेल्या मुलांमध्ये बंडखोरी, राग, आक्रमकता आणि अपराधीपणा यासारख्या असामाजिक वर्तणुकीच्या समस्या असतात. जरी काही पालकांना असे वाटते की कठोर पालकत्व चांगले वागणारी मुले तयार करणे. परंतू प्रत्यक्षात अधिक वर्तणुकीची समस्या असलेल्या मुलांची निर्मिती / प्रगती चांगली होते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

नियम स्थापित करणे आवश्यक आहे, जेव्हा आवश्यक असेल तेव्हा शिस्त लावणे आवश्यक आहे, परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मुलाला खात्री असणे आवश्यक आहे की त्याची उपस्थिती आनंद देण्यासाठी पुरेसे आहे. ज्या मुलांचे त्यांच्या आईशी जवळचे नाते असते, त्यांची शाळेत चांगली कामगिरी होते. कारण आई देखील त्यांच्या मुलांची भावनिक बुद्धिमत्ता जोपासत असते. ती त्यांना मोकळे, त्यांच्या सभोवतालच्या आणि इतरांच्या भावनांबद्दल संवेदनशील राहण्यास शिकवत असते. यामध्ये देखील सशक्त कुटुंबे एकमेकांच्या आनंदाला चालना देण्यासाठी स्वतःला वचनबद्ध करतात. वचनबद्धता अर्थपूर्ण अनुभवांची देवाणघेवाण, कौटुंबिक उद्दिष्टे निश्चित करण्यात सहभाग घेण्यापासून आणि ही उद्दिष्टे पूर्ण झालेली पाहण्यापर्यंत येते. सौम्य पालकत्व हा एक पालकत्वाचा दृष्टीकोन आहे, जो बाह्य दबावांऐवजी अंतर्गत इच्छेच्या आधारावर निवड करण्यासाठी तुम्ही आणि तुमच्या मुलामधील भागीदारीला प्रोत्साहित करतो. सकारात्मक पालकत्व हे परस्पर आदर, मुलाच्या सामाजिक आणि भावनिक विकासात सुलभता आणणे, स्तुती करणे, दृढ परंतु मैत्रीपूर्ण संवादासह स्पष्ट नियम स्थापित करणे आणि न्याय्य वागणूक याद्वारे साध्य करणे आहे. अशा कुटुंबातील मुलांचा व्यक्तिमत्व विकास अत्यंत झपाट्याने आणि चांगल्याप्रकारे होत राहतो. सकारात्मक पालकत्व, संलग्न पालकत्व, बिनशर्त पालकत्व, आध्यात्मिक पालकत्व आणि हळू पालकत्व अशा स्वरूपातील पालकत्वामुळे मुलांचा मानसिक, बौद्धिक, शारीरिक, सामाजिक, वैचारिक, भावनिक पातळीवरील व्यक्तिमत्व विकास चागल्या प्रकारे होत राहतो.



आधुनिक केसरी

**वारीत भेटली | विठु माय ||**

अंगणी तुळस | फुलली मंजिरी ||
मन हे पंढरी | धाव घेई ||१||
आषाढी कार्तिकी | विठुचा सांगावा ||
माहेरी सोडवा | नाथा मज ||२||
अनाहत नाद | कानात गुंजतो ||
आनंदी डोलतो | आत्माराम ||३||
टाळ मृदुंगाचा | ऐकता गजर ||
पडला विसर | संसाराचा ||४||
तुळशीची माळ | आज धन्य झाली ||
वारीत भेटली | विठु माय ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

संख्यारेखैव भातीति जीवनं मानुषं किल।यः ध्रुवान्वयनं सम्यक्कृत्वा जीवति जीवति ॥2॥खरोखर माणसाचे जीवन संख्यारेषेप्रमाणे भासते; नाही का ? जो या ध्रुवांचे समन्वयन करून जगतो; तोच ख-या अर्थाने जगतो.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

इच्छा दुख का रुप है, उठति वासना धार ।
इच्छा में सब कर्म है, शुभ अरु अशुभ विचार ।।२९।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल षष्ठ अध्याय) ०४/०६/२९

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
इच्छा दुःखाचं रुप आहे. इच्छेद्वारेच कर्म होतात आणि कर्मोपभोग होऊन त्याची वासना चित्तात उतरते. ही वासना संस्कार रुप होऊन जीवांना वारंवार कर्म करण्यासाठी बाध्य करते. इच्छेमुळेच जीव समस्त शुभाशुभ कर्म करतो



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## काव्य-चरितावली



पुष्प २६ वे

आधुनिक केसरी

"ब्रह्मचैतन्य"होऊनी श्रीमहाराज हो निघाले
गुरुमाई कडूनी उज्जैनी मुक्कामी आले
एकांतवासात रहाण्याच्या हेतूने ते
दाट अरण्यातल्या गुहेतच राहिले ।।
नैमिष्यारण्यामध्ये दोन वर्षे राहिले
वास्तव्याच्या दिवसात इथल्या त्यांचा
परिचय नानासाहेब पेशव्यांशी झाला
भगवंत सेवा करा,उपदेश त्यांना केला ।।
श्रीमहाराज अयोध्येस रहाण्या आले
नाम भ्रम सारा शास्त्रीबुवांचा इथल्या
रामनाम बरे होती रोग ही, बोल हा
श्रीमहाराजानी खरा करून दाखविला ।।
रामनाम सेवेने",शास्त्री बरे हो झाले
शास्त्रीबुवांची दृष्टीच बदलुन गेली
सफल झाली यात्रा असे त्यांसी वाटले
आग्रहाने श्रीमहाराजांना काशीस नेले ।।
म्हणे-कवी अरुणदास, घ्या रामनाम
घेता रामनाम , जीवा मिळतो आराम ।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# व्यावहारिक वासना तृप्त करण्यासाठी संत नसतात

आधुनिक केसरी

नोकरी केली पाहिजे असेल तर ते देणारा जिथे असतो तिथे आपण जातो; त्याप्रमाणे भगवंताची भेट घ्यायची असेल तर संत जिथे राहतात तिथे आपण जावे. परमेश्वराचे स्वरूप ओळखण्यासाठी संतांकडे जाणेच जरूर आहे. संतांचे अस्तित्व त्यांच्या देहात नसून त्यांच्या वचनात आहे. संतांजवळ निर्विषय चित्त असते. रात्री सर्वजण झोपल्यावर शिपाई जसे गस्त घालतात, तसे साधुसंत आमच्या गैरसावधतेत जागृत असतात. आपण झोपी गेलो असताना ते आपली वृत्ति तपासतात. एका बाईला मूल झाले. पण त्याला आकडी येऊ लागली. ते पाळण्यात उगीच निपचित पडून असायचे. ते मूल बरोबर वाढेना, चांगले हसेना, खेळेना. मुलाची ती अवस्था पाहून आईला बरे वाटत नसे. अगदी तसेच संतांना वाटते. शिष्य केला खरा, पण साधनांत जर त्याची प्रगती होत नसेल तर संताला वाईट वाटते. शिष्याची प्रगती होत असेल तर संत स्वतःच्या प्रेमापोटीच शिष्याला सजवील आणि त्याचे कौतुक करील. संतांना फारसे कधी कोणी चांगले म्हणत नाही. त्यांनी एकाचे कल्याण केले तर त्या माणसाचे दहा नातेवाईक त्यांना



नावे ठेवतात. संतांना ओळखण्याकरिता जे गुण सांगितले आहेत ते त्यांची परिक्षा करण्याकरिता सांगितले नसून, त्यांचा त्या दृष्टीने उपयोगही होत नाही. त्या गुणांचे आपण आचरण करावे म्हणून ते सांगितलेले आहेत. संतांजवळ राहणाऱ्या लोकांना तीन तोटे आणि तीन फायदे असतात. त्यांपैकी तोटे असे की, एक, वेदान्त बोलायला तेवढा उत्तम येतो; दोन, संतांजवळ राहिल्याने उगीच मान मिळतो; आणि तीन, 'ते, म्हणजे संत, सर्व पाहून घेतील' या खोट्या भावनेने वाटेल तसे वागतो. आता फयदे पाहू. पहिला म्हणजे, तो जर खऱ्या भावनेने संतांजवळ राहील तर तेवढ्यानेच, काही साधन न करतासुद्धा, त्याचा परमार्थ साधेल; दुसरा, त्याला मान मिळेल, पण तो स्वतः मानाच्या अपेक्षेच्या पलीकडे राहील, आणि तिसरा, वेदान्त त्याला बोलायला नाही आला तरी त्याच्या आचराणात येईल. म्हणून संतांजवळ राहणाऱ्याने ते सांगतील तसे वागावे, मानाची अपेक्षा करू नये आणि फारसा वेदान्त बोलू नये. तोंडापर्यंत आले तरी दाबून टाकावे. संतांची आज्ञा प्रमाण मानणे हे प्रचीती येण्याचे साधन आहे. व्यावहारिक वासना तृप्त करण्यासाठी संत नसतात, हे ओळखून आपण त्यांची संगत करावी. तेल आणि वात असल्यावर दिवा लावायला जसा वेळ लागत नाही, त्याचप्रमाणे आपली भूमिका थोडी तयार असल्यावर सत्संगतीचा परिणाम व्हायला वेळ लागत नाही. **आजचे बोधवचन आहे - संतांना ओळखण्यासाठी अनुसंधानाशिवाय दुसरे साधन नाही.**

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

यद्यत्परवशं दुःखं यद्यदात्मवशं मुखम् । एतद्विद्यात्समासेन लक्षणं सुखदुःखयोः ॥ स्पष्टीकरण - माणसे लहान- सहान गोष्टीत दुसऱ्यावर अवलंबून राहतात आणि दुस-याने ते काम केले नाही आणि करूनही कसे तरी केले, की मग चडफडत बसतात. पण एखादा शहाणा माणूस लवकर सावध होतो, आणि म्हणतो- 'चला, आपलं काम आपणच करून टाकू. आणि मग त्याला असा अनुभव येतो की, किती झटक्यात काम उरकून गेले ! उगाच आपण दुस-यावर अवलंबून राहिलो. तात्पर्य, स्वावलंबन हाच सुखाचा मूलमंत्र आहे !

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

गुरुवार, ११ मे २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -२४४
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

MARATHI • DAINIK • CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) • THURSDAY 11 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-244 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-10 • PRICE-5

# व्हॉट्सअॅपची होणार चौकशी

## राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**मेटाच्या मालकीची मेसेजिंग सेवा व्हॉट्सअॅपने गोपनीयतेचे उल्लंघन केल्याच्या आरोपांची सरकार चौकशी करेल, अशी माहिती इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री राजीव चंद्रशेखर यांनी दिली आहे. हा तपास ट्विटरचे अभियांत्रिकी संचालक फोड डबिरी यांनी केलेल्या दाव्याच्या पार्श्वभूमीवर होणार आहे. फोड डबिरी झोपलेले असताना व्हॉट्सअॅपने त्यांचा मायक्रोफोन अॅक्सेस केल्याचा आरोप त्यांनी केला आहे.**

फोड डबिरी यांच्या म्हणण्यानुसार, ते झोपलेले असताना आणि सकाळी 6 वाजता उठल्यानंतर देखील व्हॉट्सअॅप त्यांच्या मोबाईलचा मायक्रोफोन वापरत होता. अगदी ट्विटरचे सीईओ इलॉन मस्क यांनीही या प्रकरणावर आपली भूमिका मांडली आहे. फोड डबिरी यांची पोस्ट शेअर करत व्हॉट्सअॅपवर विश्वास ठेवता येणार नाही, असे ते म्हणाले. व्हॉट्सअॅपने मंगळवारी अभियंत्याच्या तक्रारीला प्रतिसाद दिला, व्हॉट्सअॅपने ट्विटरचे अभियांत्रिकी संचालक फोड डबिरी यांनी केलेल्या ट्विटवर उत्तर दिले आहे. या प्रकरणी व्हॉट्सअॅप गेल्या 24 तासांपासून पिक्सेल फोन आणि व्हॉट्सअॅपच्या त्यांच्या तक्रारीबद्दल त्यांच्याशी संपर्कात असल्याचे व्हॉट्सअॅपने सांगितले. तर, वापरकर्त्यांचे त्यांच्या फोनमधील माईकच्या सेटिंग्जवर संपूर्ण नियंत्रण असते, यावर कंपनीने भर दिला आहे. व्हॉट्सअॅपने त्यांचे मायक्रोफोन वापराचे धोरण स्पष्ट केले आहे. वापरकर्त्यांच्या परवानगीशिवाय व्हॉट्सअॅप माईकचा अॅक्सेस घेऊ शकत नाही, परवानगी मिळाल्यावरच वापरकर्ता कॉल करत असताना, व्हॉइस नोट किंवा व्हिडिओ रेकॉर्ड करत असतानाच व्हॉट्सअॅप मायक्रोफोनचा वापर करते. बाकीवेळा माईकचा वापर करुन



वापरकर्त्यांचे संभाषण ऐकण्याचे काम व्हॉट्सअॅप करत नाही. शिवाय, हे संभाषण एंड-टू-एंड एनक्रिप्शनद्वारे संरक्षित केले जातात, व्हॉट्सअॅप वापरकर्त्यांचे संभाषण ऐकू शकत नाही याची ती खात्री असते, असे स्पष्टीकरण व्हॉट्सअॅप कंपनीने दिले आहे.

व्हॉट्सअॅप विरोधात ही तक्रार नेमकी अशा वेळी आली आहे, जेव्हा मेसेजिंग अॅप व्हॉट्सअॅप आधीच सरकारकडून चौकशीच्या फेऱ्यात आहे. त्यामुळे, व्हॉट्सअॅप या प्रकरणाचा सामना कसा करणार हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# प्रकाश राज यांचा पंतप्रधानांना टोला

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** दक्षिण आफ्रिकेतून मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात ठेवलेल्या चित्त्यांपैकी आणखी एकाचा चित्त्याचा मृत्यू झाला आहे. मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात आणलेल्या चित्त्यांमध्ये झालेल्या झुंजीत 'दक्षा' या मादी चित्त्याचा मृत्यू झाला आहे. 'दक्षा'सह आतापर्यंत तीन चित्त्यांचा मृत्यू झाला आहे. आता या प्रकरणावरुन अभिनेते प्रकाश राज यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे. प्रकाश राज हे सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतात. नुकतंच त्यांनी ट्विटरवर एक ट्वीट केले आहे. यात त्यांनी अप्रत्यक्षरित्या पंतप्रधान मोदींवर निशाणा साधला आहे. प्रकाश राज यांनी एएनआय या वृत्तसंस्थेचे एक ट्वीट रिट्वीट करत मोदींना सवाल विचारला आहे. "५६ इंचाची छाती असणारे सेल्फी किंग आता कुठे आहेत, ज्यांनी या चित्त्यांना इथे आणण्याचे क्रेडीट घेतले होते, असे ट्वीट प्रकाश राज यांनी केले आहे. या ट्वीटबरोबर त्यांनी 'सहजच विचारतोय', असा हॅशटॅगही पोस्ट केला आहे. दरम्यान दक्षिण आफ्रिकेतील नामिबियातून मध्यप्रदेशातील कुनो राष्ट्रीय उद्यानात २० चित्ते आणले गेले होते. यातील तीन चित्त्यांचा आतापर्यंत मृत्यू झाला होता. सर्वात पहिल्यांदा 'साशा' या मादी चित्त्याचा २७ मार्च रोजी मूत्रपिंडाच्या आजाराने मृत्यू झाला होता. तर, 'उदय' हा चित्ता २३ एप्रिलला निश्चल अवस्थेत आढळून आला होता.

# आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेत भरीव तरतूद करणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : ज्येष्ठ पत्रकार, खासदार कुमार केतकर, अजय वैद्य यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना ही राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांप्रती आदरभाव आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आणि त्यांना उतारवयात सन्मानपूर्वक आर्थिक सहाय्य मिळावे यासाठी सुरू केली असून त्यासाठी भरीव तरतूद करण्यात येईल आणि या योजनेसाठीच्या अटी यासंदर्भात लवकरच बैठक घेणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे सन २०२१ आणि २०२२ चे राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी महसूल व पशुसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे, कामगार मंत्री सुरेश खाडे, खासदार हेमंत गोडसे, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रभारी महासंचालक हेमराज बागुल यांच्यासह विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे, उपाध्यक्ष महेश पवार, कार्यवाह प्रवीण पुरो, कोषाध्यक्ष विनोद यादव यांची उपस्थिती होती. शासकीय योजनांच्या प्रगतीची, राज्याच्या विकासाची माहिती सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध विकास योजना, त्यांची अंमलबजावणी, या अंमलबजावणीच्या प्रक्रियेतील लोकांचा सहभाग जनतेपर्यंत पोहोचविणे व त्याद्वारे संबंधितांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. ही भूमिका जबाबदारीने पार पाडण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांना पुरस्कार देऊन मान्यता देणे आवश्यक आहे. पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. पत्रकारांना दुर्धर आजार, अपघात झाल्यास किंवा आकस्मिक मृत्यू झाल्यास त्यांना किंवा त्यांच्या कुटुंबियांस मदत करण्याच्या उद्देशाने शंकरराव चव्हाण सुवर्णमहोत्सवी पत्रकार कल्याण निधी समिती स्थापन करण्यात आली आहे. त्याचे पुनर्गठन तसेच अधिस्वीकृती समितीचा लवकरात लवकर शासन निर्णय काढला जाईल, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. पत्रकार लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. बदलत्या काळानुसार स्वरूप बदलत आहे. प्रिंट माध्यमांचे महत्त्व कमी झाले नसल्याचे सांगून इलेक्ट्रॉनिक माध्यमांचेही महत्त्व आहे. आता समाज माध्यम दुधारी तलवारीसारखे काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले. ते विविध विषयाला वाचा फोडत आहे. पत्रकार स्वतःचा जीव धोक्यात घालून काम करतात त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारची आहे. त्यासाठी जे शक्य आहे ते करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

# पाटावरच्या शेवय्या झाल्या लुप्त ; साच्यानंतर मशिनद्वारे शेवया निर्मिती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** उन्हाळा लागताच महिला वाळवण पदार्थ करतात पुर्वी गव्हाच्या पिठापासून शेवय्या तयार केल्या जात पूर्वी आजी बाई पाटावर ( लांब फळीवर ) ओळून शेवय्या तयार करत नंतर शाच्याच्या सहाय्याने शेवय्या तयार होत आता पाटावरच्या शेवय्या लुप्त झाल्या असून आता मशिनद्वारे शेवय्या निर्मिती होत आहे .

ग्रामिण भागात पूर्वी महिला एकमेकीच्या सहाय्यातुन सरकत करत कुरडाय्या, पापड, वडे, खारड्या, पळी पापड अदि पदार्थ तयार करत असतात. पूर्वी ७० च्या दशकात यंत्र नसल्याने अनेक कामे अंग मेहनतीने केले जात असत. कुरडाय्या साठी गहु पाण्यात टाकाणे काही दिवस ठेवणे नंतर त्याचा चिक व चौथा बाजुला काढला जात होता. चोथा तिखट तेल मिठ टाकून खात असत आता तो चौथा जनावरे खातात . आंबुस चिकाला शिजवून कुरडाय्या तयार केल्या जात असत. तर शेवय्या तयार करण्यासाठी फळी पाटावर ओळून - ओळून शेवय्या तयार केल्या जात नंतरच्या २००० च्या काळात हात साचे बाज



पलंग यांना बांधून शेवय्या तयार केल्या जात असत आता २०१५ नंतर ग्रामिण भागात शेवय्या मशिन ( शेवय्या गिरणी ) आल्या आता तर या मशिनवर जाऊन महिला शेवय्या तयार करतात त्यामुळे श्रम व वेळ वाचत असल्याने अनेक जणी घरच्या साठी शेवय्या मोठ्या आवडीने करत आहेत . त्या मुळे बदलत्या यंत्र युगात अनेक जुन्या पद्धती लुप्त पावत असून त्यामुळे अनेक कामे यंत्राच्या सहाय्याने सुरू आहे. जात्या वरचे दळण ही त्या काळातील आठवण गिरणी मुळे लुप्त पावली आहे. धावत्या जगात यंत्र युग पुढे येत आहे ' त्यामुळे जुन्या पद्धती फक्त एक आठवण बनुन राहिल्या आहे . त्यातल्या फळी पाटावरच्या शेवय्या ही एक आठवण ठरत आहे.



## बारा तास वीज देणार

आधुनिक केसरी

राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानीचे अजून भरपाई मिळाली नव्हती, मात्र भाजप आणि शिवसेनेचे सरकार आल्यानंतर आम्ही सर्व नुकसानभरपाई शेतकऱ्यांना मिळवून दिली असल्याचे सांगत देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. भंडारा येथे हंगामा संदर्भात घेतलेल्या बैठकीत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर टीका करत शेतकऱ्यांसाठी मोठ्या घोषणा केल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या या घोषणेमुळे अवकाळी आणि गारपीटीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची हंगामा संदर्भात बैठक घेण्यात आली, त्यामुळे आगामी खरीप हंगामासाठी भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने उपयुक्त असलेले बी-बियाणे आणि रासायनिक खतांचा उपयुक्त साठा उपलब्ध असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले की, रासायनिक खतांची उचल करण्याच्या दृष्टीने भंडाऱ्यात रॅक पॉईंट नसल्याने तुमसर येथे रॅक पॉईंट निर्माण करण्याच्या दृष्टीनेही सरकारचे प्रयत्न सुरु आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा फायदा होणार असल्याचे सांगितल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री सौर कृषी योजना माध्यमातून शेतकऱ्यांना कृषीसाठी 12 तास वीज देणार असल्याचे मोठे अश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. सोलर फिडर लावून त्या माध्यमातून शेतकऱ्यांना मदतीचा हात देणार असल्याचे अश्वासनही फडणवीस यांनी यावेळी दिले आहे. त्याच बरोबर 100 गावांमध्ये युक्त शिवार योजनेचे काम हाती घेण्यात येत आहे. शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी सोलर फिडर लावण्यासाठी जागा खरेदी करण्यात येत असून त्यामधून सोलर फिडरसाठी शेतकऱ्यांना 50 हजार रुपय वार्षिक देण्यात येईल. देवेंद्र फडणवीस यांनी भंडारा येथे बोलताना सांगिते की, धान खरेदीचं वाढीव उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मागील वर्षी जी धान खरेदी झाली त्यांचे 99 टक्के शेतकऱ्यांना चुकारे देण्यात आलेले आहे. तर भंडारा जिल्ह्यात चार वेळेस अवकाळी पावसामुळे मोठे नुकसान केले आहे, त्यामुले शेतकरीही हैराण झाले आहेत. त्यातील तीन वेळेचे पंचनामे झाले असून शेवटचे पंचनामे आता अंतिम टप्प्यात आहेत. तर 2020-21 मध्ये महाविकास आघाडी सरकारच्या काळामध्ये झालेल्या नुकसानीचा अद्याप मोबदला शेतकऱ्यांना मिळालेला नसतानाही आमच्या सरकारने मात्र शेतकऱ्यांना पूर्ण मोबदला दिल्याचे त्यांनी सांगितले.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

## शहरांमधील वाहतूककोंडी चिंताजनक

आधुनिक केसरी

**जागतिक वाहतूक कोंडीत पुणे जगात सहाव्या क्रमांकावर असल्याचे एका सर्वेक्षणातून समोर आले आहे. राहण्यासाठी योग्य आणि शिक्षणाचे माहेरघर असलेले पुणे आता वाहतूक कोंडीत जगात सहाव्या क्रमांकावर आल्याने पुणेकर चिंतेत पडले आहेत. जगभरातील विविध देशांच्या मोठ्या शहरातील वाहतूककोंडीचे सर्वेक्षण करून टॉम टॉम या संस्थेने वाहतूक कोंडीचा अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालानुसार, भारतातील तीन शहरांत सर्वाधिक वाहतूक असल्याचे समोर आले आहे. बंगळुरू जगात दुसऱ्या क्रमांकावर ,पुणे सहाव्या आणि दिल्ली सतराव्या क्रमांकावर आहे. आपल्या देशात काही वर्षांपासून लोकसंख्येच्या प्रमाणात मोठ्या शहरात तसेच महानगरांमध्ये वाहनांची संख्या तितक्याच प्रमाणात दिवसेंदिवस मोठ्या वेगाने वाढत आहे.**

प्रत्येक शहरात अपुरे रस्ते आणि पार्किंगची सोय पुरेशी उपलब्ध नसल्यामुळे माणसांपेक्षाही जास्त जागा व्यापणाऱ्या या वाहन समस्येवर कुठले उपाय शोधायचे, असा मोठा प्रश्न स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारसमोर निर्माण झाला आहे. एकीकडे स्मार्ट सिटी आणि खेड्यांच्या विकास सरकारी स्तरावर होत आहे. आज नागरिकरणाची आवश्यकता जरी असली तरी लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये तिथल्या सोयीसुविधांचादेखील गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. आज देशाची लोकसंख्या 142 कोटींच्यावर गेलेली आहे; पण त्या प्रमाणात विशेषकरून महानगरात कोटींच्यावर वाहनांची संख्या गेली आहे; पण पुरेसे रस्ते आणि पार्किंगची सोय उपलब्ध नाही. जी भविष्यात अतिशय चिंतेची बाब ठरणार आहे, असे चित्र दिसते. 2017-18 च्या आकडेवारी नुसार भारतात सुमारे 25 कोटी 30 लाख पेट्रोल डिझेल वर चालणारी वाहने आहेत. आता ही संख्या दुप्पट झाली असावी. वाहतूककोंडीसारख्या समस्येवर उपाय म्हणून वाढत्या वाहन संख्येवर मर्यादा आणण्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही.

एकट्या पुण्यात जवळपास 45 लाख वाहने आहेत. त्यात आठ लाख कार आणि घरातील प्रत्येकाची वेगळी दुचाकी असल्याने दुचाकीची संख्या तुलनेने जास्त आहे. 35 लाखांपेक्षा जास्त दुचाकी पुण्यात आहेत. पुणेकर खासगी वाहनांचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात. यात रस्ते, उड्डाण पुलाची सुरू असलेली कामे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, शहरभर मेट्रोचे काम सुरू आहे. त्यामुळे अनेक मार्ग वाहतुकसाठी बंद ठेवण्यात येत आहे. पुण्यात 10 किमी अंतर जाण्यासाठी 27 मिनिटे लागत असल्याचे सर्वेक्षणातून समोर आले आहे.वाहतूक कोंडीच्या यादीत ब्रिटनची राजधानी लंडन पहिल्या क्रमांकावर आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील लोकसंख्येचा विचार करता दोन व्यक्तीमागे एक वाहन अशी स्थिती आहे. विविध बॅकांसह फायनान्स कंपन्यांकडून तत्काळ मिळणारे कर्ज, कमी हप्ता आणि डाउन पेमेंट, कमीत कमी कागदपत्रांची गरज आदी कारणांमुळे कोणतेही वाहन घेणे त्यातही दुचाकी घेणे सोपे झाले आहे. कोल्हापूरची लोकसंख्या अंदाजे ३८ ते ३९ लाख आहे, तर सर्व प्रकारच्या वाहनांची संख्या १६ लाख ४३ हजार आहे. लोकसंख्या आणि वाहन यांचा विचार करता दोन व्यक्तीमागे एक वाहन अशी स्थिती आहे.

वाहन हे गरज म्हणून घेतले जाते की, आपल्याकडे असलेल्या पैशाचे किंवा श्रीमंतीचे प्रदर्शन माडण्यासाठी घेतले जाते याचादेखील विचार करण्याची वेळ आली



आहे. माझ्याकडे पैसा आहे म्हणून मी चार चार, पाच पाच वाहने घेईन आणि ज्यांच्याकडे त्याच पैशामुळे एकही वाहन होऊ शकत नाही अशा सामान्य माणसाला चालण्यासाठीदेखील जागा उपलब्ध करू देणार नाही, अशी जर त्यांची मानसिकता असेल तर वाढती वाहने ही सुविधा ठरण्याऐवजी एक मोठी समस्याच म्हणावी लागेल. यावर पर्यायी उपाय म्हणून केंद्रीय परिवहन विभागाचे उपाययोजना म्हणून एखाद्याकडे एक वाहन असताना दुसरे वाहन घेतले तर त्या दुसऱ्या वाहनावर शंभर टक्के जास्तीचा कर आकारण्याचे सुचविले आहे. तसेच ज्यांच्याकडे वाहन ठेवण्याची व्यवस्था आहे. त्यांनाच वाहन घेण्याची परवानगी दिली जावी, असे सरकारकडे सुचविले आहे. परंतु आपल्या देशात नियमांमधून पळवाटा काढणाऱ्यांची संख्या आज कमी नाही. दुसरे वाहन खरेदी करताना घरातल्याच दुसऱ्याच्या नावावर वाहन दाखविण्यापासून बनवेगिरी केली जाऊ शकते. परंतु या सगळ्या शक्यता लक्षात घेऊन मोठया शहरांमध्ये वाढणारी वाहने कोणत्याही परिस्थितीत नियंत्रणात आणावी लागतील आणि त्याकरिता प्रत्येक कुटुंबाकडे एक वाहन हेच तत्व राबवावे लागेल. त्यासाठी आधार कार्ड किंवा पॅन कार्डचा पुरावा आणि स्वतःचे स्वतंत्र घर असल्यास ते जास्त फायदेशीर ठरेल, असे वाटते.

आज देशातील दिल्ली, बंगळुरू, मुंबई ही मोठी शहरे वाहनांमुळे इतकी फुगली आहेत की रोजचा शहरातल्या शहरात होणारा एकूण प्रवास हा तीन ते चार तास वेळ घेत आहे. शहरांचे नियोजन करताना रस्त्याचे नियोजन योग्य पद्धतीने होणे महत्त्वाचे ठरते. ज्याची मोठी कमतरता सर्व मोठया शहरांमध्ये दिसते. यापुढे प्रत्येक गृहसंकुलामध्ये पार्किंगची व्यवस्था तसेच प्रत्येक गृहसंकुलांच्या मागे शंभर फुट रस्त्याचे नियोजन आणि त्याच्यापुढे असलेल्या गृहसंकुलाच्या पटीत चौपदरी रस्त्याची बाधणी, अशी नवी विकास नियमावली अंमलात आणण्याची गरज आहे. नव्या शहरांचे नियोजन करताना प्रत्येक घरी दोन ते चार वाहने गृहीत धरून रस्त्याचा आकार आणि प्रमाण निश्चित करावे लागले. विशेषतः स्मार्ट सिटीची कल्पना राबवताना ज्याला आपण पायाभूत सुविधा म्हणतो त्या रस्त्यांना अधिक महत्त्व देण्याची गरज आहे. रस्ते, पाणी, वीज या मूलभूत सोयींचा विचार करताना त्याच्या प्रमाणाची किंवा पूर्ततेची नवी व्याख्या ठरविण्याची वेळ आली आहे, असे वाटते. पाणी किंवा विजेचे नियोजन करताना थोडाफार वाव मिळू शकतो परंतु एकदा शहरांची बांधणी झाली तर नव्याने रस्ते तयार करणे शक्य होत नाही आणि म्हणून आधी रस्ते आणि मग गृहसंकुले याप्रमाणे असा वेगळा विचार करण्याची वेळ केंद्र व राज्य सरकार यांच्यावर आलेली आहे. या आगोदर जशी जागा उपलब्ध होईल तशी रस्त्याची सोयीप्रमाणे जोडणी केली जायची आणि मग गृहसंकुले बांधली जायची; पण आता बदलत्या परिस्थितीमध्ये शहराच्या किंवा अगदी लहान गावांचा विकास आराखड्यांमध्ये या गोष्टींना विशेष प्राधान्य दिल्यास ते जास्त फायदेशीर ठरू शकेल. कारण शेवटी औद्योगिक किंवा आर्थिक विकासाचे गणित मांडताना दळणवळणाच्या सोयीसुद्धा विचार करताना त्याठी रस्ते मोठे असणे आणि भविष्यातील वाहन संख्येला सामावून घेणारे असायला पाहिजे. तरच देशातील तसेच राज्यातील वाढती वाहन समस्या नक्कीच काही प्रमाणात सुटू शकेल यात शंका नाही.

## नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य : संक्षिप्त परिचय

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्य पूर्व काळात महाराष्ट्रात दारूच्या व अन्य अंमली पदार्थाच्या व्यसनाची मुळीच लागण झालेली नव्हती . याचे मुख्य कारण त्यावेळच्या परकीय सरकारच्या दारू विक्रीच्या धोरणाविरुद्ध महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील व देशातील पुढाऱ्यांनी कसून विरोध केला होता. जनजागृती द्वारा जनतेस दारूच्या व अन्य पदार्थाच्या व्यसनापासून दूर राहण्यासाठी प्रवृत्त केले होते. म्हणूनच त्यावेळेस इथली जनता व्यसनापासून दोन पावली दूरच होती. परिणाम महाराष्ट्र हा देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या अग्रभागी होता. ही बाब देशाच्या व महाराष्ट्राच्या दृष्टीने अभिमानाची होय. स्वातंत्र्यानंतर 1949 रोजी महाराष्ट्रातील मंत्रिमंडळाने एकमताने दारूबंदी कायदा महाराष्ट्र सह गुजरातमध्ये संमत केला. त्यावेळेस राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते सहा एप्रिल 1950 पासून या कायद्याची अंमलबजावणी दोन्ही राज्यात सुरू झाली. त्यासाठी सरकारने दारूबंदी विभाग सुरू केला.**

संपूर्ण दारूबंदीचा कायदा असताना व्यसनामुळे नशेमुळे होणाऱ्या उपद्रवांचा जो बंदोबस्त होतो. ती परिस्थिती कायदा शिथिल केल्याने किती भयानक झालेली आहे. याचा गंभीर विचार करून संपूर्ण दारूबंदी कायद्याची फेररचना व्हावी. व्यसनाच्या उपद्रव्यापासून समाजाला मुळीच त्रास व भय वाटणार नाही. याच उद्देशाने कायद्याची रचना झाली पाहिजे. यासाठीच नशाबंदी मंडळांने दारूबंदी कायदा शिथिल केल्यानंतर नशाबंदी ऐवजी नशा मुक्ती याच ध्येयाने आपली वाटचाल आजपर्यंत अखंडितपणे चालू ठेवलेली आहे. महाराष्ट्रात दारूबंदी शिथिल झाल्यानंतर नशाबंदी मंडळाने व्यसनमुक्ती या विषयावर कार्य सुरू केले. परंतु जेव्हा नशाबंदी मंडळ सुरू झाले तेव्हा संपूर्ण समाजामध्ये व्यसन म्हणजे दारू हा प्रकार मोठ्या प्रमाणात होता. त्यामुळे नशा बंदी मंडळ हे प्रामुख्याने दारूबंदी वर कार्यरत होते .परंतु दिवसेंदिवस वाढलेल्या व्यसनांच्या प्रकाराबरोबरच त्या समवेतच विविध व्यसनावर जागृती प्रबोधन करून व्यसनींना मतपरिवर्तनातून मुक्त करण्याचा संकल्प केलेला आहे. ज्यात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या माध्यमातून आज मोठ्या प्रमाणात व्यसनांचे प्रमाण प्रत्येक समाज घटकातील वयोगटापर्यंत पोहोचलेले आहे. त्यामुळे तंबाखूजन्य पदार्थाच्या दुष्परिणामाबाबत मोठ्या प्रमाणात जनजागृती मंडळ करत आहे . सध्या अमली पदार्थाचे वाढते आयाम व त्यांची सहज उपलब्धतेमुळे याचे प्रमुख बळी हे तरुण युवक व शालेय विद्यार्थी बनत आहेत. त्यामुळे पदार्थांच्या संदर्भात ही संस्था कार्यरत आहे. नवीन युगाचे नवीन व्यसन म्हणजे इंटरनेट .हे व्यसन युवकाबरोबरच घरोघरी पोहोचलेले असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अनेक युवक मनोरुग्न होऊन मानसिक आजाराने ग्रस्त झालेले आहेत. त्यामुळे नशाबंदी मंडळाचा आजचा उद्देश हा व्यसनाधीन व्यक्तींना व्यसनमुक्त करून पूर्णपणे व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी कार्यरत आहे. 16 ऑक्टोबर 1958 रोजी स्थापन झालेले नशाबंदी मंडळाचे जनक केदारनाथजी डॉ. भास्कर पटेल, डॉ. त्रिंबक नरवणे , पंधे गुरुजी, शंकररावजी आडीवरेकर, लक्ष्मणराव केळकर, एम पी झायीवाला, पुरुषोत्तम कानजी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, माधवराव देशपांडे , सं.ल.सिलम, सुशीला आडीवरेकर, बुवासाहेब गोसावी ,गणपती देसाई ,डॉ. एम. डी. गिल्डर, यांच्या पुढाकारातून हे मंडळ अस्तित्वात आले आहे. नशाबंदी मंडळाचा उद्देश

१ ) मतपरिवर्तनाच्या आणि समजूतीच्या मार्गाने दारूच्या आणि इतर मादक पदार्थांच्या व्यसनात सापडलेल्या लोकांना आणि अशा अमली पदार्थाचा बेकायदा धंदा करणाऱ्यांना या व्यसनातून आणि बेकायदा धंद्यातून मुक्त करणे व एकदा मुक्त झालेले पुन्हा या मार्गात येणार नाहीत याच्यासाठी प्रयत्न करणे २ )वरील उद्देशाच्या पूर्तीसाठी इतर व्यक्तींचे किंवा संस्थांचे सहाय्य आणि सहकार्य मिळविणे. ३ )नशाबंदीस पोषक अशी मासिके, लेख ,पुस्तके ,चित्रे वगैरे तयार करणे व प्रसिद्ध करणे. ४ )मादक पदार्थांच्या अनिष्ट परिणामाबद्दल संशोधन करणे व अशा संशोधनास उत्तेजन देणे. ५ )व्यसनमुक्तीसाठी करमनुकीचे साधने व केंद्र निर्माण करणे ती चालविणे, इतरांनी अशी साधने व केंद्रे चालविली असल्यास त्यांच्याशी सहकार्य करणे किंवा त्यास मदत करणे. ६ )नशाबंदीस पोषक अशी प्रदर्शने ,स्पर्धा ,निदर्शने ,शिबिरे भरविणे किंवा त्यास मदत करणे. ७ ) कार्यकारणी ठरविल त्या कोणत्याही योग्य मार्गाने नशाबंदीचा वरील उद्देश सिद्ध करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपायांचा अवलंब करणे.

:व्यसनमुक्ती प्रचार प्रसार प्रबोधन उपक्रम

* व्यसनांचे प्रकार व त्याचे दुष्परिणाम आणि उपाय या संदर्भात माहिती देणारे पत्रक वाटप करणे
* व्यसनमुक्तीपर पोस्टर्स प्रदर्शन लावणे
* व्यसनमुक्तीपर गीत ,भजन, चित्रकला व पोस्टर स्पर्धा घेणे * शाळा महाविद्यालय व धार्मिक परिसरात तंबाखूमुक्त कायद्याचे फलक लावणे
* गणेशोत्सव- व्यसन विरोधी देखावा - घोषवाक्य स्पर्धा - व्यसन घालवा उत्सव वाचवा. *डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यसन विरोधी पथनाट्य स्पर्धा
* महात्मा फुले व्यसनमुक्ती युवा परिषद
*आम्ही शिक्षक व्यसनमुक्तीचे प्रशिक्षक अभियान
* 26 जून सामाजिक न्याय व अमली पदार्थ सेवन विरोधी दिन साजरा करणे
* व्हॅलेंटाईन डे - प्रेम करा खुल्लम करा जोडीदार मात्र निर्व्यसनी निवडा * नव वर्ष धुंदीत नव्हे शुद्धीत साजरे करा - जागृती अभियान.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



अखिल भारतीय महिला काँग्रेस अध्यक्षा नेट्टा डिसोझा तसेच अध्यक्षा संध्याताई सव्वालाखे महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस कमिटी यांच्या आदेशानुसार महिला खेळाडू पैलवान समर्थनार्थ व कुस्ती महासंघाच्या अध्यक्ष तसेच भाजपचे खासदार ब्रिजभूषण यांच्या विरोधात दीपाली मिसाळ, शहरजिल्हा महिला अध्यक्ष काँग्रेस कमिटी यांच्या नेतृत्वाखाली व शहरजिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख युसुफ यांच्या प्रमुख्य उपस्थितीत क्रांती चौक येथे खेळाडू महिला भगिनींच्या समर्थनार्थ कॅण्डल आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हा महिला अध्यक्ष हेमा पाटील, काँग्रेस प्रवक्ता डॉ. पवन डोंगरे, इब्राहिम पठाण, महासचिव अनिस पटेल, जयप्रकाश नारनवरे, शीला मगरे, नीलेश अंबावडेकर, प्रवीण देशमुख, इंद्रप्रभा खंडारे, विभावरी मोरे, निर्मला शिखरे, शेख अथर, कैसर आजाद मोहित जाधव, सागर नांगरे, प्रशांत शिंदे, सुमेध नारनवरे, रुबीना सय्यद, विद्या लांडगे, रुक्मिणी खंडागळे, पूजा गायकवाड, शुभांगी गायकवाड, बबन दिंडोरे पाटील, अशोक डोळस, अजमत खान, जयपाल दवणे आदी उपस्थित होते.



# घर बांधा मस्त; परतूरकरांचा टाहो पण वाळू मिळणार कधी?

## वाळू डेपो नसल्याने भूरट्या वाळूमाफियांची चांदी

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश कवडे**

**परतूर :** राज्य शासनाने सहासे पन्नास रुपये प्रति ब्रास असा वाळू उपसा बाबत नविन जीआर काढला आहे. राज्यात अनेक ठिकाणी या नव्या धोरणांची अंमलबजावणी देखील करण्यात आली असून सर्वसामान्यांना दिलासा मिळाला असला तरी परतूर तालुक्यातील रहीवासीयांनी वाळू स्वस्त होणार असल्याने आपले स्वप्नातले घरे बाधण्याचे थांबवले आसल्याचे चित्र परतूर शहरात सध्या पहायला मिळत आहे. जालना जिल्हयात अनेक ठिकाणी वाळू उपसा डेपोची आखणी करण्यात आली आहे.त्या वाळू उपसा डेपोचे टेंडर प्रक्रिया सुरू असून कुणीही टेंडर घेत नसल्याचे बोलले जात आहे . या कारणांमुळे स्वप्नातील घरे बांधणाऱ्यां परतूर तालुक्यातील रहीवासीयातुन असा प्रश्न उपस्थित होतो की, राज्य शासणाच्या नव्या धोरणानुसार ची वाळू कधी मिळणार ? का मिळणारच नाही असे अनेक प्रश्न तालुक्यातील रहीवासियांना पडत आहेत . मात्र असे सत्र चालु आसताना बाबुलतारा , घेटुळी , डोल्हारा , आंब, नांद्रा या वाळू पट्टयातील बेसुमार रात्रभर अवैधरित्या राजरोसपणे वाळूचा उपसा करित आहेत. अव्वाच्या सव्वा भावाने हे भुरटे वाळू माफिया परतूर तालुक्यातील रहिवाशांना वाळू विकत असुन सर्वसामान्याची लुट करित आहेत . मात्र महसुल विभाग , परतुर पोलिस मुद्दामुन दुर्लक्ष करित असल्याचे बोलले जात आहे. या कारणांमुळे तालुक्यातील भुरट्या वाळू माफियांची मात्र चांदी होत आहे. तरी परतूर तालुक्यात वाळू डेपोची निर्मिती करुण तात्काळ रहीवासीयां ना नव्या धोरणांनुसारची वाळू उपलब्ध करून देण्यात यावी यासाठी प्रशासनाने उपाय योजना कराव्यात .

# पाच हजार सापांना जीवदान देणारे सर्पमित्र भगवान पवार

## आतापर्यंत असंख्य दुर्मिळ साप पकडण्यांचा विक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** तालुक्यातील मुळगाव बाडगीचा पाडा ( ननाशी ) येथील पण सध्या वणी येथे वास्तव्यास सर्पमित्र भगवान पवार हे नाव सध्या उभ्या महाराष्ट्रात सर्पमित्र या रूपाने गाजत आहे. आतापर्यंत जवळजवळ पाच हजाराच्या वर अत्यंत दुर्मिळ जातीचे सर्प पकडले आहे. व त्यांना जीवदान दिले आहे.

सात मे रोजी अल्बिनो धुळ नागीण " पकडून भगवान पवार यांनी एक आगळा वेगळा विक्रम केला आहे. वणी येथील इंदरचंद चोपडा यांच्या दुकानातील फरशी खाली साप असल्याचे पाहिल्यानंतर सर्पमित्र पवार यांना फोन केल्यानंतर काही मिनिटात पवार हे घटनास्थळी दाखल झाले. व फरशी खालुन अत्यंत दुर्मिळ जातीचा व नाशिक जिल्ह्यात प्रथमच आढळलेला अल्बिनो धुळ नागीण हा बिगर विषारी साप पकडला व जंगलात सोडून दिला. आतापर्यंत पवार यांनी तिन हजारोंच्या वर अत्यंत विषारी साप व दोन हजाराच्या वर बिगर विषारी साप पकडण्यांचा विक्रम केला आहे. पवार हे वयाच्या सहा वर्षांपासून आपले आजोबा हरिभाऊ काशिराम पवार यांच्या मार्गदर्शनाखाली साप पकडण्याची कला शिकले आहे. व पवार हे साप पकडण्यांच्या कलेचा गुरू ते आपल्या आजोबांना मानतात.त्यांनी सर्वप्रथम ही कला शिकतांना वयाच्या सहाव्या वर्षी सात फुट धामण जातीचा साप पकडून आपल्या सर्पमित्र कारकिर्दीला प्रारंभ केला. तेव्हा पासून आतापर्यंत कुठल्याही आर्थिक लोभाची अपेक्षा न ठेवता ते फक्त एक फोन केला तर काही मिनिटापर्यंत ते साप असणाऱ्या स्थळी हजर होतात. हे पवार यांचे खास वैशिष्ट्य आहे.

आतापर्यंत पवार यांनी अनेक अशा दुर्मिळ जातीच्या सापांना पकडून जीवदान दिले आहे. त्यात किंग क्रोबा ,घोणस, नाग, वेगवेगळ्या स्वरूपांच्या धामणी,आता नुकताच वणी येथील दुकानात पकडलेला अल्बिनो धुळ नागीण, इनलँड टायपन, कोस्टल टायपन, बँडेड कँरेट, साँ-सेकेल वायपर,रेसल वायपर, इस्टर्न टायगर,बुमस्लँग, फेर डी लान्स, ब्लाँक मांबा,अशी अनेक दुर्मिळ जातीचे असंख्य साप पकडण्यात आलेले आहे. हे उत्साहाने सर्पमित्र भगवान पवार सांगतात.



**सापांचे जीवदान हेच आमचे ध्येय :** अनेक जण साप दिसला त्याला मारतात . पण सापांना मारु नका . कारण साप हा शेतकरी वर्गाचा मित्र आहे . याकारणांमुळे आम्ही आमच्या आजोबांकडुन सर्प पकडण्यांची कला अवगत करून आतापर्यंत पाच हजारांच्या वर साप पकडण्यांत यशस्वी झालो आहे . आम्ही जेवढे आतापर्यंत साप पकडले ते वनविभागाच्या आधिकारी वर्गाची परवानगी घेऊन ते विविध ठिकाणच्या जंगलात सोडून देतो व सापांना जीवदान देतो . सापांचे जीवदान हेच आमचे ध्येय आहे .आम्ही एकच मागणी आहे की या गोष्टी ची शासनाने दखल घेऊन आम्हाला शासनाने मदतीचा हात द्यावा जेणेकरून आमच्या कुटुंबांला त्यातून आधार मिळेल .

–भगवान पवार ( सर्पमित्र वणी ता .दिंडोरी )

महाराष्ट्र Business Katta












# बेपत्ता महिला : सामाजिक समस्या



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**सध्या देशाचा जर विचार केला तर, देशामध्ये दररोज अनेक महिला बेपत्ता होण्याच्या तक्रारी दाखल होत आहेत. हा खूप चिंतेचा विषय आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकांच्या हितासाठी काम करणारे सरकार सर्वसामान्य लोकांना हक्क न्याय अधिकार मिळवून देऊन त्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी सरकारची असताना, जर महिला बेपत्ता होत असतील, आणि सर्व यंत्रणा असून सुद्धा त्या महिलांचा शोध जर लागला जात नसेल तर, हा विषय अजून गंभीर होऊन बसतो. भारतात खरे बोलणे म्हणजे विद्रोह होतो, आणि सरकार विरुद्ध बोलणे देशद्रोह होतो. सरकारने खोटे नाटे काल्पनिक, काहीही सांगितले तरी त्याला सत्य मानून तसे वागणे त्यालाच देशभक्त व धर्माला मानणारा व्यक्ती म्हणून मान्यता मिळते.**

बाकीच्यांना देशद्रोह आणि धर्मविरोधी म्हणून शिक्का मोर्तब होते. हे वास्तव नाकारता येणार नाही. नेहमीच धर्माचा विषयावर काही ना कुठे ना कुठे द्वेष व मत्सर पसरवून दंगल केली जाते, तर सरकारने ज्या गोष्टीवर काम करायला पाहिजेत त्या गोष्टीवर काम न करता सरकारच धार्मिक गोष्टीवर काम करून, धर्माला प्राधान्य देत आहे. आणि म्हणून प्रत्येक ठिकाणी धर्माचा उल्लेख केला जातो कोणत्याही कामांमध्ये धर्म आणि किंवा कोणत्येही काम दुसऱ्यावर ढकलून देणे, यातच सरकार धन्यता मानत आहे. सरकारचा जर एक विचार केला तर धर्माच्या नावाखाली सरकारने गाईला अत्यंत महत्त्व दिलेले आहे. ही धर्माची माता असून तीच रक्षण संरक्षण करणे आवश्यक आहे. असा संदेशही सरकारने सर्वसामान्य जनतेला दिलेला आहे. गोहत्या बंदी कायदा करून गोहत्या थांबवण्याचा प्रयत्न सरकारने केलेला आहे. देशातून सर्वात जास्त गो मांस विदेशात निर्यात करणाऱ्या कंपन्या सर्वात मोठ्या कंपन्या यांच्यासाठी मात्र हा कायदा लागून नसल्याचे स्पष्ट दिसून येते. तो भाग वेगळा असला तरी एखाद्याच्या पिशवीमध्ये गोमांस आहे अशा संशयावरून तरुणांची हत्या केली जाते, परंतु त्याच देशामध्ये स्त्रीची सुद्धा देवी म्हणून पूजा केली जाते. परंतु स्त्रीची देवी म्हणून पूजा केली जाते तिच्या संरक्षणाच्या, तिच्या न्याय हक्काचे व त्याच्या सन्मानाचे पाऊल सरकार उचलताना दिसत नाही. गाईला वाचवणारे बाईला का बर वाचवत नसेल. हा सर्वात मोठा प्रश्न समोर येतो. हल्ली समोर आलेल्या माहितीनुसार गेल्या पाच वर्षांमध्ये एकट्या गुजरात मधून 41621 महिला बेपत्ता झाल्या आहेत. पाच वर्षांमध्ये एवढ्या महिला बेपत्ता होणे हा किती गंभीर विषय आहे, आणि या गंभीर विषयावर स्त्रीची पूजा करणारी लोक स्त्रीचा सन्मान करणारे लोक, सरकार मीडिया कोणीच का बोलत नसेल, एवढे मोठ्या प्रमाणात स्त्रिया बेपत्ता झाल्यात त्यांच्यासोबत नेमकं काय झाले ? कुठे असतील ? कशा असतील याचा शोध सरकार घेत नसेल, मीडिया प्रश्न विचारात नसेल, आणि जे स्त्रीची पूजा करतात त्यांच्या जर भावना दुखत नसतील, तर अशा लोकांना माणूस म्हणावे का ? हा प्रश्न समोर उभा राहतो. पोलिसांकडे सर्वाधिकार व यंत्रणा कार्यरत असूनही जर पोलीस त्याचा शोध घेऊ शकत नसतील, आणि लोक एवढ्या महिला बेपत्ता झाल्या कुठेत यासाठी रस्त्यावरील आंदोलन करत नसतील, तर आम्ही गाई विषयी संवेदनशील आहोत परंतु बाई विषयी नाही, हीच दिसून येते. महाराष्ट्राचा जर विचार केला तर मागील तीन महिन्यांमध्ये पाच हजारापेक्षा जास्त महिला बेपत्ता आहेत. महिला बेपत्ता होणे या गंभीर बाबीवर कोणीच चर्चा करत नाही. याचा अर्थ नेमका काढायचा तरी काय ? एका गाईसाठी वादंग निर्माण करणारे लोक बाईसाठी गप्प बसतात. याचा अर्थ त्यांच्या मनामध्ये बाई विषयी संवेदनशीलता, आदर, सन्मान हा राहिलेला नाही. स्त्रीची देवी म्हणून पूजा फक्त धर्म सांगते म्हणून करतात. सन्मान मात्र हेतू पुरस्कार टाळला जातो. हेच आपल्या वर्तनातुन दिसून येते. दिल्ली येथील एका निर्भयासाठी लाखोच्या संख्येने महिलांचे मोर्चे निघालेत, तेव्हा असं वाटलं महिलांच्या समस्येसाठी किमान महिला तरी जागृत आहेत. आणि महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी महिला तरी रस्त्यावर उतरतात. परंतु ही अपेक्षा फोल ठरली. कारण एकीकडे हजारोच्या संख्येने महिला बेपत्ता होतात, त्यांचा कोणताही शोध लागला जात नाही. त्यामुळे मेणबत्ती घेऊन रस्त्यावर आलेल्या महिला, बेपत्ता झालेल्या महिलांविषयी एक शब्द बोलत नाहीत किंवा त्यांच्याविषयी न्याय मागत नाहीत, ही शोकांतिका आहे. दुसरी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे दिल्ली येथे लैंगिक शोषणाचे आरोप करून आरोपीला अटक




व्हावी, आरोपीची योग्य ती चौकशी होऊन आरोपीला शिक्षख व्हायला पाहिजेत, परंतु अशी कोणतीही संकेत सरकारकडून दिसत नाहीत. म्हणजे गाई साठी भावनिक होणारे लोक, न्याय हक्कासाठी स्त्रीच्या अस्मितेसाठी जर आवाज उठवत नसतील, उलट पक्षी आवाज दाबणाऱ्याला समर्थन करत असतील, तर महिलांविषयी आदर प्रेम सन्मान हे सर्व बेगडी आहे. व धर्माच्या नावाचा वापर राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी केला जातो हेच सिद्ध होते. गाईला धर्माशी जोडून, गाई साठी लढले जाते, परंतु बाईचा आवाज दाबून बाईला न्यायच मिळू नाही अशी व्यवस्था निर्माण करून, हे सरकार आजही मनुस्मृतीचे पालन करून, महिलेला दुय्यम समजते. हेच यामधून दिसून येते. स्त्री ही जगाची जननी आहे. आणि जगाच्या जननीला न्याय मिळत नसेल, आणि आरोपीला सत्ता मिळत असेल तर सरकार न्यायाचे, जनतेचे नसून धर्माच्या नावाखाली हुकूमशाही निर्माण करणाऱ्या प्रवृत्तीचे व मनुस्मृतीचे पालन करणाऱ्या मनवृत्तीचे सरकार आहे. हेच यामधून दिसून येते. महिलांनी महिलांच्या अत्याचारासाठी रस्त्यावर न उतरणे, बेपत्ता महिलांसाठी सरकारला जबाब न विचारणे, हेही राजकीय षडयंत्र आहे असेच समजावे. कारण निर्भया प्रकरणात रातोरात लाखो महिला एकत्र येतात, त्यांना रुमाल मेणबत्ती एका वेळेस पुरवण्यात येतात, परंतु दिल्ली येथील महिलांना आंदोलनासाठी उपलब्ध असलेली वीज सुद्धा कट करण्यात येते. पिण्याचे पाणी सुद्धा बंद केले जाते अशी अवस्था असताना निर्भया प्रकरणात समोर आलेल्या महिला त्या राजकीय उद्देशाने समोर आणल्या होत्या आणि दिल्ली येथील प्रकरणात राजकीय उद्देशांमुळेच समोर येऊ दिले जात नाही. हे स्पष्ट होते प्रधानमंत्रीच्या राज्यांमधून 41 हजार 621 महिला बेपत्ता होतात. याचा जबाब विचारण्याची हिंमत राज्य सरकार व केंद्र सरकारला कुणी दाखवत नाही, याचाच अर्थ आंदोलन, कॅन्डल मार्च ,हे फक्त सरकारच्या हितासाठी केली जातात. सर्वसामान्य व महिलांच्या हिताचे, न्यायाचे, कोणाला काही घेणे देणे नाही. याची प्रचिती यामधून येते. महिलांना न्याय मिळत नसेल यासाठी आंदोलन करावे लागत असेल, तर हा खूप चिंतेचा विषय आहे. बेपत्ता झालेल्या महिलांचा शोध लागत नसेल, तर कुठे आहेत कशा आहेत ? कशासाठी बेपत्ता ? झाल्यात याचे कारणे समजत नसतील, तर महिला बेपत्ता होण्यामागे खूप मोठे षडयंत्र असून महिलांसाठी खूप मोठा धोकादाय आहे. व यामध्ये कोणतीही महिला कधीही अडकू शकते. म्हणून भविष्यातील महिला बेपत्ता न होण्यासाठी महिलांनी जागृत, नागरिकांनी समोर येऊन धर्माला महत्त्व न देता, तर कर्माला महत्व देऊ न्याय हक्काची लढाई लढण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. व धर्माच्या नावाने राजकारण करून राजकीय पोळी भाजणाऱ्या लोकांना धडा शिकवून त्यांना त्यांची जागा दाखवली, तरच महिला व सर्वसामान्य लोक सुरक्षित होतील.

# हमारा अभियान हर घर-हर मन संविधान




नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र.: 7276526268

आधुनिक केसरी

**जगाच्या पाठीवर '२०५ पेक्षा जास्त देश' आहेत. पण या सर्व देशांचा आणि त्यांच्या राज्यकारभारांचा अभ्यास जेव्हा तुम्ही-आम्ही करायला सुरुवात करतो, तेव्हा भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांचा प्रचंड अभ्यास आणि दूरदृष्टीचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. एक अतिशय 'वैशिष्ट्यपूर्ण' असं लिखित 'संविधान' ह्या खंडप्राय आणि प्रचंड विविधता असलेल्या आपल्या देशाला लाभलेले आहे. भारतीय राज्यघटनेची महत्वाची 'वैशिष्ट्ये' पुढीलप्रमाणे आहेत:-**

**४) लोककल्याणकारी राज्याचा पुरस्कार :**
लोककल्याणकारी राज्य बनवण्याच्या दृष्टीने 'आयर्लंड'च्या राज्यघटनेवरून प्रेरित 'राज्य धोरणाची निर्देशक (मार्गदर्शक)' तत्वांचा समावेश आपल्या राज्यघटनेत करण्यात आलेला आहे. राज्यघटनेतील या मार्गदर्शक धोरणांचा उद्देश व्यक्तीचा 'सर्वांगीण विकास' साध्य करुन 'लोककल्याणकारी राज्य' निर्माण करने हाच आहे. धर्म, जात, वंश, प्रदेश असा कोणताही भेदभाव लोककल्याणाच्या बाबतीत न करता प्रत्येक व्यक्तीचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकास साध्य करण्याची जबाबदारी शासनाची असल्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

**५) मुलभूत हक्कांचा समावेश :**
प्रत्येक भारतीय नागरिकाला सुखी, समृद्ध व प्रतिष्ठेचे जीवन जगता यावे म्हणून, भारतीय राज्यघटनेच्या 'भाग तीन' मध्ये 'मुलभूत हक्कांचा' समावेश करण्यात आलेला आहे. राज्यघटनेतील 'अनुच्छेद १२ ते ३५' हे अनुच्छेद नागरिकांचे मूलभूत हक्क स्पष्ट करतात. घटनाकारांनी संविधानाच्या माध्यमातून आपल्या सर्व भारतीयांना समानतेचा, स्वातंत्र्याचा, शोषणाविरुद्धचा, धार्मिक तसेच आपली सांस्कृतिक विविधता जपण्याचे अशे बरेचशे स्वातंत्र्य बहाल केलेले आहेत. कोणी ह्या अधिकारांचे उल्लंघन करत असेल, तर 'न्यायालयात' जावून दाद मागण्याचा देखील अधिकार, हा आपला मुलभूत अधिकार म्हणूनच दिलेला आहे.




भाग -५

**६) मुलभूत कर्तव्यांचा समावेश :**
संविधानाच्या 'भाग-चार (क)' मधील 'अनुच्छेद ५१-क' मध्ये आपणा सर्व भारतीयांची 'मुलभूत कर्तव्ये' विस्ताराने दिलेली आहेत. संविधानाच्या '४२ व्या घटनादुरुस्ती' नुसार अनुच्छेद-५१ (क) हा आपल्या संविधानाचा भाग बनलेला आहे. आपण आपले अधिकार आणि हक्क मागत असतांना देशाप्रती असलेल्या कर्तव्यांची देखील जाणिव ठेवणे महत्त्वाचे आहे. अर्थातच ही संविधानिक कर्तव्ये इमानदारीने पुर्ण करणारेच खरे 'देशभक्त' असतात.

**७) संसदीय लोकशाहीचा स्विकार :**
भारतीय संविधानाने 'संसदीय लोकशाही'चा स्विकार केलेला आहे. संसदीय लोकशाही व्यवस्था 'कायदेमंडळ' व 'कार्यकारी मंडळ' यांच्यातील सहकार्य व समन्वयाच्या तत्वांवर आधारलेली असते. संसदीय शासनव्यवस्थेत 'मंत्रीमंडळाची निवड' कायदेमंडळाच्या (संसद) सदस्यांकडून केली जाते. तसेच 'मंत्रिमंडळ' हे कायदेमंडळाला जबाबदार असतात. शिवाय 'राष्ट्रपती' हे नामधारी, तर 'प्रधानमंत्री' हे वास्तव कार्यकारी प्रमुख असतात. भारतात घटक राज्यांच्या स्तरावर देखील 'संसदीय शासन व्यवस्था' निर्माण करण्यात आलेली आहे. घटक राज्यांच्या स्तरावर 'राज्यपाल' हे नामधारी, तर 'मुख्यमंत्री' हे वास्तविक कार्यकारी प्रमुख असतात.

**८) स्वतंत्र व एकात्मिक न्यायव्यवस्था :**
भारताच्या राज्यघटनेने 'स्वतंत्र व एकात्मिक' न्यायमंडळाचा पुरस्कार केलेला आहे. न्यायमंडळावर दडपण येऊ नये, म्हणून न्यायाधीशांचे निवृत्तीचे वय, त्यांचा कार्यकाळ घटनेने निश्चित केलेला आहे. विविध प्रकारचे न्याय मिळविण्यासाठी कोणत्याही दबावापासून मुक्त असणारी न्यायव्यवस्था निर्माण केलेली आहे. एकात्मिक न्यायव्यवस्थेच्या सर्वोच्च स्तरावर 'सर्वोच्च न्यायालय', राज्य स्तरावर 'उच्च न्यायालय', तर त्याखालील स्तरावर 'कनिष्ठ न्यायालयांची' श्रृंखला असते. या व्यवस्थेत 'केंद्रीय कायदे' तसेच 'राज्य कायदे' दोन्ही प्रकारचे कायदे अंमलात आणले जातात.

क्रमशः...

# मुली बेपत्ता होण्याची आकडेवारी खळबळजनक



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**विदेशी संस्कृतीचा वाढता प्रभाव,बदलती जीवनशैली, बदलतं जीवनचक्र, इलेक्ट्रॉनिक माध्यमतील आक्षेपार्ह बाबीचा बोलबाला, टिव्ही सिनेमा या मधील विकृत आचरण, मोबाईलमध्ये नको नको अहितकारक बाबी,आजुबाजुच वातावरण, या सगळ्यांचे गंभीर परिणाम संस्कारावर होत असल्याने अनेक समाजिक समस्या उदभत आहेत. आणि सध्या तर कहर झाला असंच वातावरण निर्माण झाले आहे. मुली बेपत्ता होत आहेत या बाबतीत वेगवेगळ्या दैनिकात वृत्त वाहिन्या वरून प्रसारीत झालेल्या वृत्तानुसार खळबळ जनक आकडे छापुन येत आहेत.**

मग नेमकं खरं काय आहे. खोटं काय आहे तसंच या सनसनाटी मागिल नेमकं सत्य काय आहे. मग पालकांनी आपल्या मुलींना शिक्षणासाठी नौकरी साठी दुर ठेवायचं धैर्य कसं दाखवायचं असे एक नाही अनेक प्रश्न या निमित्ताने सामाजिक तसंच कौटुंबिक पातळीवर निर्माण होत आहेत. पण या प्रश्नांची उकल होण्या अगोदर हे सगळं जाणीव पूर्वक तर केलं जातं नाही ना अथवा या मागे काही षडयंत्र आहे का एखादी शक्ती कार्यरत आहे का यापैकी नेमकं वास्तव काय आहे. आणि वेगवेगळ्या वृत्तानुसार जर हे खरं असेल तर मग असं का घडतंय कुटुंब म्हणून आपण कुठे कमी पडतोय याच सुद्धा चिंतन आवश्यक आहे. मुली ह्या तशा हळव्या मनाच्या असल्याने कौटुंबिक पातळीवर त्यांच्या सोबत संवाद वाढवला पाहिजे. मुलींना कौटुंबिक पातळीवर वात्सल्य माया आपुलकी जिव्हाळा, कमी पडत आहे का म्हणून त्याचे परिणाम स्वरूप अशा घटना घडत आहेत. हे पण अवलोकन करण्याची आवश्यकता आहे. मागिल कही दिवसात राज्यासह देशातील वेगवेगळ्या राज्यात मुली गायब होण्याची आकडेवारी ज्या पद्धतीने प्रसिद्ध होत आहे. ते चित्र खुप विचित्र विलक्षण आणि अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारं आहे. अगदी राज्यनिहाय , जिल्हा निहाय समोर येणारी आकडेवारी पाहुण राज्यात सगळीकडे खळबळ उडाली आहे. पालका वर्गात चिंतेच वातावरण निर्माण झालं आहे. देशाला स्वातंत्र्य मिळुन जवळपास पंचाहत्तर वर्ष पूर्ण झाली आहेत. एका बाजूला प्रचंड प्रगती होत असताना दुसऱ्या बाजुला सामाजिक पातळीवर अशा परिस्थिती मध्ये अशा सनसनाटी बातम्या प्रसिद्ध होण म्हणजे अंतर्मुख करणारी बाब नक्कीच आहे. पण नेमकं या मध्ये सत्यता आहे का हे सामाजिक पातळीवर तपासुन पाहणं गरजेचं आहे. पण सदर बातम्या पुर्ण पणे अफवा आहेत असंही म्हणता येणार नाही. या मध्ये अंशतः तरी सत्यता नक्कीच आहे. असं गृहीत धरून भविष्यात असं होणार नाही याची काळजी घ्यावी लागणार आहे. कौटुंबिक तसंच सामाजिक पातळीवर जागृती झालीच पाहिजे. कौटुंबिक वात्सल्य जिव्हाळा हा वाढलाच पाहिजे. मुलींना कौटुंबिक पातळीवर प्रचंड मोठ्या प्रमाणात आपुलकी माया ही मिळाली पाहिजे जेणेकरून बाह्य भौतिक जगाच आकर्षण त्यांच्या मनात वाढीस लागणार नाही. अथवा तशी हालचाल असेल तर तात्काळ क्षणी लक्षात येईल. कौटुंबिक वात्सल्य समोर इतर भौतिक मित्रता हि फार प्रभावी ठरणार नाही अशी आखणी कौटुंबिक पातळीवर असली पाहिजे. तसं पाहिलं तर मानवी मन हे खुप चित्र विचित्र असतं मग स्त्री असो कि पुरूष मुलगा असो कि मुलगी मनाची चंचलता हि खूप प्रभावी असते. मग हेच मन कोंडुन किती दिवस राहणार त्या मनाला कुठे अंकुर दिसला कि ते तिथे उमलत फुलत मग एकदा मन उमल कि परीणामाची तमा असते कुठं आणि कोणाला, मग हा संवाद आकर्षण हे विकोपाला जाऊन नको ते घडत हे सगळं सहज घडत नाही. हीं बर्याच दिवसांची प्रक्रिया असते. संगत कशी आहे हे पण खूप महत्वाचं ठरत. पालक म्हणून आपण आपल्या मुलांच्या सोबत मित्रा सारखे संपर्कात असल् पाहिजे. पालक म्हणून मुलं आपल्याला घाबरतात मग मुलांच्या मनात काय चाललंय याचा अंदाज आपल्याला लागतं नाही. हा अंदाज चुकु देयचा नसेल तर मुलांना अगदी मित्र समजुन त्यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या पाहिजे. संवाद साधला पाहिजे जेणेकरून जीवनातील अनेक धोके त्यांना समजावले पाहिजे. काहि बाबींची आवश्यकता असली नसली तरी सुद्धा जीवनशी निगडित प्रत्येक बाब हि ज्ञान सदृश पद्धतीने मुलींना समजावली पाहिजे. प्रत्येक बाब त्याचे चांगले वाईट परिणाम त्यांचे गंभीर परिणाम काय असतात या बाबतीत सचेत केलं पाहिजे. या सगळ्या बरोबर संस्कारांचे डोस ज्ञान हे वारंवार पाजलं पाहिजे.

# मायाळू आजी...!



अय्युब पठाण लोहगांवकर
संपर्क क्र. 9764350374

आधुनिक केसरी

**शाळेच्या वाटेवर एक वडाचे मोठे झाड होते. त्या झाडाच्या बुंध्याला एक पार बांधलेला होता. दहा वाजले की पेरूवाली आजी तिथे यायची. टोपली खाली टेकायची. डोक्यावरची चुंबळ काढून तीच अंथरायची नि त्यावर बसायची. बंडू आणि खंडू म्हणजे त्या शाळेतली दोन खोडकर मुले होती. फसवाफसवी, खोटेनाटे, मारामारी, दादागिरी हाच त्यांचा उदयोगधंदा होता. त्यांनी अभ्यास कधीच केला नाही. नाव शाळेचे नि काम खोडयांचे असा त्यांचा उदयोग होता. सर्व वर्गावर त्यांचा वचक होता. पेरूवाली आजीचा बंडू व खंडू या जोडीवर जास्त विश्वास होता.**

आजी दुसऱ्या कोणत्याही मुला- मुलींना पेरू उधारीवर देत नव्हती, पण बंडू व खंडूला मात्र देत होती. डुलत-डुलत बंडू व खंडूची जोडी आली. हे दोघे आजीचे कारकून होते. आजीला लिहीता-वाचता येत नव्हते. आजी त्यांना प्रेमाने म्हणायची, " या रे माझ्या लेकरांनो. " आजीने त्यांना आपल्या हातांनी दोन पेरू दिले. आजी त्या दोघांना सुट्टी वगळता रोज उधारीवर पेरू दयायची. आणि आजी पिशवीतून चुरगाळलेला कागदाचा तुकडा काढायची आणि बंडू व खंडूला त्यांच्या पेरूची उधारी लिहीण्यास सांगायची. ते दोघे आजीसमोर खोटेनाटे काहीतरी लिहायाचे. आणि शाळा भरल्यावर वर्गात जायचे. आजी तो कागद पिशवीत ठेऊन त्यांच्याकडे पाहत राहायची. कारण आजीला एकुलता एक मुलगा होता. तो उच्च शिक्षण घेऊन अमेरिकेत मोठया पदावर नोकरीवर होता. तो तेथून दर महिन्यास आईला महिनाभर पुरतील इतके पैसे पाठवायचा. त्याला पण दोन मुले होती. ती बंडू आणि खंडूच्या वयातली. रोज अमेरिकेतील मोठया शाळेत जायची. आजीला आपल्या नातवांची खूप आठवण यायची. त्या आठवणी खातर पेरूवाली आजी शाळेतल्या मुला-मुलींना पाहायची, आणि डोळे पुसायची. म्हणून आजी बंडू व खंडूला आपल्या नातवांप्रमाणे जीव लावायची. तसे पाहता आजीला पेरू विकण्याची काहीच गरज नव्हती. पण नातवांच्या आठवणी खातर शाळेत शिकणाऱ्या मुला-मुलींना मन भरून पाहता यावे म्हणून आजी पेरू विकण्यासाठी शाळेत यायची. त्या दिवशी मधली सुटी झाली. शाळा सुटली तरी झाडाच्या पारावर आजी दिसली नाही. आजीला ताप आला होता. म्हणून आजी घरीच पडून होती. तिच्याकडे तीच्या मुलाने पाठविलेले पैसे एका गाडग्यात आजीने जपून ठेवले होते. परंतु आजीला जागचे हालता येत नव्हते, इतकी कमजोरी आलेली होती. आजी दोन दिवस एकटीच घरात अन्नपाण्याशिवाय पडून होती.

बंडू आणि खंडूला आजीची फार आठवण येत होती. कारण दोन दिवसापासून पारावर शांतता होती. पण पेरूवाली आजी मात्र काही दिसत नव्हती. बंडू-खंडूला पश्चाताप झाला की, आपण म्हाताऱ्या आजीला फसविले. हे आपण काही चांगले केले नाही. असे त्यांना मनोमनी वाटायला लागले. तिसऱ्या दिवशी ते दोघे लवकर शाळेतून बाहेर पडले. आजीच्या घरची वाट लांबची होती. घराच्या आसपास ऊसाचे मळे होते. नंतर आजीचे घर. त्यांनी आजीला दाराबाहेरून आवाज दिला. आजीचे घरचे दार उघडेच होते. आतून आवाज आला की, " या रे माझ्या लेकरांनो, आत या." आजीचा आवाज खोल गेलेला होता. कारण आजीला खूप ताप आलेला होता, आणि आजीचे हातपाय हालचाल करीत नव्हते. बंडू व खंडूने आजीला चहा करून पाजला. मग आजीला थोडी तरतरी आली. आजीला डॉक्टरांकडे नेणे भाग होते. पण तिला दवाखान्यात नेणे खूप अवघड होते. आजीने त्या दोघांना सांगितले की, " माझ्याकडे पैसे आहे, बघा त्या गाडग्यात. त्या दोघांनी गाडग्यात पाहिले तर त्यामध्ये आर्धा गाडगा चिल्लरने भरलेला होता. वरती



पाचशे-पाचशे रुपयांचे चार बंडल होती.पैसे पाहून इथेही त्या दोघांच्या मनात पैसे चोरण्याचे आले होते.

परंतु मनातून त्यांना वाटेनासे झाले. त्यांना सारखी-सारखी आजीच्या जुन्या आठवणी येत होत्या अगोदरच आपण आजीला फसविले. मग त्यांनी त्यातून एकही पैसा घेतला नाही. गावातल्या जोशी डॉक्टरला त्यांनी कारमध्ये घेऊन आणले. डॉक्टरांनी आजीला तपासले व आपल्या दवाखान्यात नेले. आजीच्या आजाराची बातमी वाऱ्यासारखी शाळेत पसरली. शाळेतील मुले-मुली आपापल्या वेळेनुसार आजीला पाहण्यासाठी दवाखान्यात जात. दोन-चार दिवसानंतर आजी बरी झाली, व तीला दवाखान्यातून सुटी मिळाली. बंडू व खंडूने आजीच्या गाडग्यातल्या पैशाला हात न लावता, आपापल्या आई-वडिलांकडून पैसे आणून डॉक्टराचे बील दिले. त्या दोघांनी आजीला तिच्या घरी पोहचविले. आजीचे घर शाळेच्या मुला-मुलीने पार भरून गेले होते.

आजीने सर्व मुला-मुलींना खाली बसविले. आणि सांगितले, " मला एक मुलगा आहे. तो उच्च शिक्षण घेऊन दूर देशी अमेरिकेत मोठ्या पदावर नोकरीला आहे. त्यालाही दोन मुले आहे. ती आपल्या बंडू आणि खंडूसारखीच दिसतात. मला एकटीला घरी करमत नाही म्हणून, आणि मला माझ्या नातवांची फार आठवण येते, म्हणून मी पेरू विकण्याच्या बहाण्याने शाळेत येऊन तुमच्यातच माझ्या नातवांना पाहते. आणि तेव्हा मला खूप समाधान वाटते." हे ऐकल्यावर बंडू व खंडूला रडू आवरेना. सर्व मुले-मुली आजीला धरून रडाया लागली. आजीने ही डोळ्याला पदर लावला.

# अस्वस्थ मनाच्या गाभाऱ्यात दाटलेल्या आईच्या आठवणीने... मी मातृसूक्तात बुडालेला जोगिया..!

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : १६



काल १० मे रोजी मातृदिन होता. मातृदिनाच्या निमित्ताने प्रत्येकालाच आईच्या आठवणी सतावत राहतात. खरेतर आईच्या आठवणींचा आलेख मोजक्या शब्दात बंदिस्त करताच येत नाही; परंतु काही निवडक आठवणींना मात्र उजाळा देता येतो. कवी माधव ज्युलियन, कवी फ.मुं.शिंदे, कवी ग्रेस, अशा अनेक कवींनी आपल्या आईविषयी कविता लिहून कृतज्ञता व्यक्त केली आहे. खरेतर आईची कृतज्ञता व्यक्तच करता येत नाही. कारण तिच्यामुळेच ही दुनिया, हे जग आपण पाहू शकलो आहोत... मीही मातृदिनानिमित्त माझ्या आईच्या काही आठवणींना उजाळा देण्याचा भावनिक प्रयत्न केला आहे. रात्रीचे अकरा वाजलेले...भयान शांतता. मनात कमालीची अस्वस्थता.... तुडुंब काळोखासह अवकाश डोळ्यात साठवून गच्चीवर निःशब्द निपचित पडलेला मी... जीव गुदमरून जावा एवढा भयग्रस्त... डोक्यात प्रश्नांचे काहूर घेऊन मनाच्या गर्तेतल्या अथांग दरीत कोसळलेला मी..!

'आठवणींच्या पारंब्यांना लोबकळत राहणारी माझी अवस्था...अगदीच अनकॉन्सिअसमध्ये गेलेल्या पेशंटसारखी.... बेवारस पेशंटभोवती कुणीच नसावे.. तसा वाराही अवतीभवती फिरकत नव्हता... अर्ध्या तासानंतर एक थंड झुळूक दिलासा देणारी...

ती अमावस्येची रात्र.... अस्वस्थ मनाच्या विविधांगी प्रस्तरातून उलगडत गेलेली... तिच्या गोड आवाजातली अनेक गाणी अनुवंशिकतेने माझ्यात साठवलेली...तिच्या आवाजातले त्या गाण्याचे सूर कधी मांडीवर झोपून ऐकलेले.. कधी जात्यावर दळताना ऐकलेले...तर कधी निंदताना , खुरपतांना.. पण तिचा आवाज अगदी लताबाईच्या आवाजासारखा मिळताजुळता.... तिला तिच्या माहेरातूनच मिळालेली ही आवाजाची देणगी...! तिच्या सगळया खानदानीतलं एखादं मूल जरी रडलं तरी सुरातच रडणार...! अंजनीच्या साठ्यांचं घराणं म्हणजे स्वरगंगेचं माहेरघर... सरखाराम साठ्यांची क्लोरेनेट ऐकली आणि संपतराव साठ्यांचे ट्रम्पेट ऐकले की, मला वाटायचं मी सुरेल मामाचा एकुलता एक भाचा... एका सुरेल इंद्रायणीचं लेकरू..अर्थात माझी आई इंद्रायणी विठोबा साठे. म्हणजेच ती साठ्यांची लेकबाळ....! तिच्या आठवणीने दाटून कंठ येतो नि फुटू लागतो बांध मनाचा...!

मध्यरात्र.... पेंगलेले नेत्र....अनेक हात कुशीत शिरलेले... या निरव शांततेत माझ्या कानावर रेडिओत एका जुन्या गाण्याची धून आदळताच मनाचा बांध फुटला.... ते गाणं कधीही आणि कुठेही ऐकलं की, माझ्या मनाचा बांध फुटतोच.... आणि तिच्या आठवणीने मी एकांतात हुमसून हुमसून रडू लागतो... तिच्या आवाजाचं आणि त्या गाण्याचं काहीतरी नातं असल्याचा मला भास होतो... गाण्याच्या सुरुवातीलाच राव्याचं कुजबुजणं नि लगेच.....आलाप.. आ.....

**सुनो सजना पपिहेने कहां सबसे पुकारके.. संभल जाओ चमनवालों के आये दिन बहारके..."**

माझ्या मनाची अवस्था.. इंद्रायणीच्या डोहाचे कंगोरे ढवळल्यागत झालेली...मी जणू संध्यासुक्तात बुडालेला... अवघ्या इंद्रियांसह.. .!

**अवघीच इंद्रिये गाती तिच्याच दुःखाची गाथा| स्मरणाच्या काललयीवर हा देहच होई माथा !**

हा संपूर्ण देहच माथा होऊन मी घालू लागतो लोटांगण....तिच्या अदृश्य पदकमलावर... तिला पाहण्यासाठी माझ्या समस्त देहाला डोळे लगडलेत. आणि माझ्या नसानसातून अश्रुंचे पाट वाहताना... मी अनुभवतोय..! या देहाला बैचन करणारी ती रात्र.... मला त्याच गीताचा अंतरा താललयीत गुणगुणायला भाग पाडते....

**देखो ना ऐसे देखो, मर्जी है क्या तुम्हारी, बेचैन करना देना, तुमको कसम हमारी.. हमी दुश्मन ना बन जाएँ कहीं अपने करार के...**

या अंतऱ्यात तिने माझ्यावर केलेल्या संस्कारांचे उल्लंघन होऊ देऊ नये..असा भावार्थ मी लावत राहतो...!

आई माझ्या बेचैन मनावर मला ताबा मिळवून दे, "तुला माझी शपथ.". मला तुझ्या आठवणीने एवढे अस्वस्थ करू नकोस..! अनावर अश्रुंना वाट करून देतांना उसासे मागे झरू लागतात...

**"ओंजळीत माझ्या माझे उसासे आणि भोवताली आभाळ भासे"**

इंद्रायणीच्या कुशीतून बाहेर आलेला मी... पुन्हा इंद्रायणीच्या आठवणीत डुंबत जातो... अनावर आठवांचे शल्य इतके बोचरे की, अख्ख्या देहालाच आठवणींच्या जखमा होऊन जाव्या.....तिने आयुष्यभर भोगलेल्या दुःखाची गाथा तुकारामाच्या गाथेप्रमाणेच तरंगणारी..माझ्या मनगंगेच्या डोहावर..! प्रपंचाच्या अनेक प्रश्नांचे तांडव सुरु असूनही तिची आठवण एका गाण्याच्या स्वरलयीतून पाझरत जाणारी......

**"किती प्रश्न भोवती आणि मन रिकामे कशाचे करावे स्वतःशी खुलासे....."**

जीवनसंचिताच्या साचेबंद स्वप्नांना कितिदा हुलकावणी देत जातो मी....आई त्यांपेक्षा मला कुठल्यातरी कारागृहात बंदिवान व्हावं वाटतं गं.. अनेक स्वप्नांना कवेत घेऊन उगाचच दिलासे देत जगण्यापेक्षा.....!

तसा मी गर्दीतही एकटाच असतो.... गर्दीतून अनेकांचे धक्के पचवूनही जपत असतो एकलेपण.... हिंस्त्र आणि मतलबी माणसांचे बेगडी रूप न्याहाळण्यासाठी..!

दाखवायचे वेगळे नि खायचे वेगळे.. ह्या वृत्तीची आता भीती वाटू लागली आहे ; कारण जखमांचे उत्सव साजरे करणारांचे काफिले सुद्धा खोट्या प्रतिष्ठेशिवाय जगूच शकत नाहीत...म्हणून 'मला नकोसा वाटतोय हा उद्विग्न वर्तमान'.."खोट्या आवर्तनात बेगडी आनंद शोधणारा."... यापेक्षा माझ्या आरसपानी स्वप्नांना कवेत घेऊनच जगावे वाटते तुझ्या आठवणींच्या प्रदेशात...! आईचा सासुरवास आणि तिच्या जिंदगीची तिनेच सांगीतलेली कथा..माझ्या कवितेतून...

कसं निखरट दैव, त्याला नाही आली कीव
नको नको सांगू माये, तुही करमकहानी

ऐकताना डोळ्यांमधीं, येतं पसाभर पानी
राब-राबली कष्टली, तुव्हा फाटका संसार

तुव्हं खोटं खोटं भाग्य, दैवाचाही खोटा सार
मायबापाची गरीबी, नाही बोळवण साधी

सासरीही कष्ट केले, नाही धूसफूस कधी
बारा गाड्या गरिबीत, कशी जन्मली तू माय

कसायाच्या घरी जणू, गुणी जन्मली तू गाय
तुह्या बापाची गरिबी, तशी गेली शेवटाला

सासरीही फाटकाचं, तू गं संसार थाटला
कामामधी जलम गेला, तुही सुद् तुला नाही

जातं, चुलं नि वावर , देई कामाची गवाही
कोंबड्यानं बांग द्यावा, तव्हा तुह्या हाती जातं

नव-याचं तुह्यासंग , गाय कसायाचं नातं
उठे तांबडं फुटता, तशी बसे जात्यावर

उपाशी न राहे कुणी, तुव्हा जीव नात्यावर
तुह्या मांडीवर डोकं, मला येई गाढ झोप

कणी कोंड्याचं दळण, चार पायल्याचं माप
दिसं निघायच्या आधी, बारा घागरी नदीच्या

तुह्या कष्टामुळं येई, पानी डोळ्यात नदीच्या
कोसभर गावनदी, तुह्या चोवीस चकरा

रांजणाला येई कीव, माय बळीचा बकरा
गव-याबी थापल्या तू, रोज सारवण केलं
तुह्या सासुबाईच्या तं, कधी मना नाही आलं

मोठी सून मनू मनू, रातं दिन काम केलं

सास-यानं तुह्या तुला, नाही अंतर गं दिलं
सासू होती कैदासीन, सासरा तं बापावानी

त्याला ठाऊकच होती, तुह्या जुल्माची कहानी
तुह्या पोटामधीं भूक, आतड्याला पडे पीळ

माय करायची कामं, उपाशी ती ईळ ईळ
पाचविला पुंजलेला, तुला कष्टाचा डोंगर

बापाच्या मागं . .मागं, तुवा हाकिला नांगर
चार वरसाचा होतो, तव्हा कलली सावली

घास खुंटला मुखात, मही दु :खात मावली
जावा पोटामधीं घास, माय तडफडे भारी

पोटाच्याच दुखापायी, नाही मिळाली भाकरी
माय गरोदर तरी ,खायी पाथरीची भाजी

खाण्यापिण्याच्या नावानं, करी परपूस आजी
असं कसं भाग्य तुव्हं, किती नशीब फाटकं

संसारात नाही केलं, कधी खोटं तू नाटकं
तुह्या गळ्यामधी होता, लताबाईचा गोडवा

मह्या कवितेला आला, तुह्या ओवीचा गोडवा
तुह्या नशिबाचे गिर्हे, कसे उलटे फिरले

तुह्या दैवाचे उखाणे, कसे दु :खाने चोरले
कसं निखरट दैवं, त्याला नाही आली कीव

जलमभर सोसलेल्या, दुखण्यानं गेला जीव

**तुझा मुलगा**
**धोंडोपंत मानवतकर,**
**१० मे २०२३**

# कन्नड शहरातील दूषित पाण्यामुळे आरोग्य धोक्यात

## अन्यथा तीव्र आंदोलन करू : पवन सोनवणे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील नगर परिषदेचे कामकाज सध्या प्रशासक मुख्यअधिकारी नंदकुमार भोंबे हे बघत आहे. परंतु प्रशासक असुन देखिल ते मर्जीतल्या लोकांच काम करत असल्याचा ठपकाही त्यांच्यावर ठेवण्यात येत आहे. सुमारे पंन्नास ते सत्तर हजार लोकसंख्या असलेल्या कन्नड शहरासाठी पिण्यासाठी पाणी सोडले जात आहे परंतु पाणी पिण्या योग्य नसल्याने नागरीकांना पिण्यासाठी जार विकत घ्यावा लागत आहे आर्थिक बाबीला  सामारे जावे लागत आहे अतिशय दुदैवी बाब असुन याच पाणीचे योग्य ते नियोजन करून योग्य तुरटी वापरून जल शुद्ध केले तर नागरीकांना पाणी पिण्या योग्य होईल व नागरीकांचा आरोग्याचा धोका निर्माण होणार नाही परंतु भोंबे हे या सर्व गोष्टीकडे सोईनुसार दुर्लक्ष करत असल्याचे दिसुन येत आहे सदरील बाबीस आळा घालण्यासाठी एकलव्य संघटनेचे पवन सोनवणे यांनी थेट जलशुध्दी केंद्रावर भेट दिली असता तुरटी अत्यंत निष्कृष्ट असल्याचे निदर्शनास आनुन दिले या वेळी ते बोलतानी म्हणाले की सदरील तुरटी निष्कृष्ट असुन जल ही शुध्द नसल्याने पाणी पिण्या योग्य नाही. तरीही निष्कृष्ट तुरटी वापरून



शासनाचे पैसे घशात घालणाऱ्या गुत्तेदारावर कठोर कारवाई करावी व त्यांचे टेंडर रद्द करावे अश्या बेजाबाबदार वागण्यामुळे नागरीकांना पाण्याचा जार विकत घ्यावा लागत असल्याने खिशाला कात्री लागून लाखो रुपयाचे पिण्याचे पाणी विकत घ्यावे लागत आहे तसेच आरोग्याचा प्रश्नही भेडसावत आहे असेच सुरू राहिले तर नागरिकांच्या आरोग्याला मोठी हानी झाली तर याला जबाबदार कोण असाही प्रश्न समोर येत आहे.

नगरपरीषदच्या इ टेंडर प्रणाली मध्ये जाणीव पुर्ण खोडसाळ पणा केल्याने मुळे टेंडर साईड चुकीची असल्या कारणाने इच्छुक गुत्तेदाराला टेंडर मिळत नाही या मुळे मर्जीतल्या गुत्तेदारांनाच टेंडर मिळत आहे असा धक्कादायक बाब समोर येत आहे हे सर्व भोंबे जाणीव पुर्वक करत आहे अशी जोरदार चर्चा सध्या शहरात सुरु आहे . या संदर्भात नंदुकुमार भोंबेशी दुरध्वनीवर संपर्क साधला असता त्यांनी फोन घेतला नाही .



निष्कृष्ट दर्जेची तुरटी वापरल्या मुळे पिण्यासाठी पाणी योग्य नसल्याने शहरातील नागरीकांना लाखो रुपयाचे पाणी विकत घ्यावे लागत आहे तसेच तुरटी गुत्तेदार शासनाची फसवणुक करून लाखो रुपये घश्यात घालत आहे या गुत्तेदारावर कठोर कारवाही करून गुत्तेदाराच लायसन रदद करावे असे नाही झाले तर तीव्र आंदोलन करू .

**पवण सोनवणे, एकलव्य संघटना अध्यक्ष**

## संदीप उफाडे यांना शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** महाराष्ट्रामध्ये विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या तरुणांना संजीवनी फाउंडेशन संगमनेर यांच्यामार्फत दरवर्षी शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यावर्षी हा पुरस्कार दिंडोरी तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष, शेतकरी चळवळीतील युवा नेतृत्व संदीप उपाडे यांना जाहीर झाला आहे. 1 जून 2023 रोजी महाराष्ट्रातील नामवंत मान्यवरांच्या हस्ते संदीप उफाडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. संदीप उफाडे हे अनेक वर्ष शेतकरी चळवळीमध्ये सातत्याने काम करत आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर वाचा फोडून रस्त्यावरची लढाई लढण्यात ते अग्रभागी असतात. शेतकरी हिताच्या कार्याची  दखल घेऊन त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी, प्रदेशाध्यक्ष संदीप जगताप यांच्यासह दिंडोरी  तालुक्यातील अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



संदीप उफाडे यांना मिळालेला हा पुरस्कार म्हणजे शेतकरी चळवळीचा सन्मान आहे .शेतकरी संघटनेत घरावर तुळशीपत्र ठेवूनच काम करावे लागते .ज्या मातीत आपण जन्माला आलो त्या माणसांसाठी आपण काही केलं पाहिजे या स्वच्छ हेतूने आज संदीप आमच्या सोबत काम करत आहे .अतिशय कष्टाळु व प्रामाणिक कार्यकर्त्याचा सन्मान बघून आम्हा सर्वांना आनंद झालाय .

**– संदीप जगताप, प्रदेशाध्यक्ष , स्वाभिमानी शेतकरी संघटना**

## आडगाव बुद्रुक ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी पार्वताबाई चव्हाण यांची बिनविरोध निवड




आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** आडगाव बुद्रुक ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी पार्वताबाई पंढरीनाथ चव्हाण यांची मंगळवारी बिनविरोध निवड करण्यात आली.पार्वताबाई चव्हाण यांची बिनविरोध निवड जाहीर होताच समर्थकांनी फटाके व गुलाल उधळत आपला आनंद साजरा केला. आडगाव बुद्रुक ग्राम पंचायतीच्या सरपंच सुरेखा धोंडीबा गवरे यांनी आपसात ठरल्याप्रमाणे आपल्या सरपंच पदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी मंगळवारी ग्राम पंचायत आडगाव बुद्रुक कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली.यावेळी सरपंच पदासाठी पार्वताबाई चव्हाण यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने मंडळ अधिकारी मनेश खरे यांनी पार्वताबाई चव्हाण यांची बिनविरोध निवड जाहीर केली.यावेळी ग्रामपंचायत आडगाव बुद्रुक ग्रामसेवक एस के भावले,तलाठी बाबासाहेब गोरखनाथ बागुल,आजी माजी सरपंच,उपसरपंच,सदस्य व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सरपंच पदी निवड जाहीर झाल्या नंतर निर्वाचित सरपंच व गावकऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.  आणि पार्वताबाई चव्हाण यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. गावकऱ्यांनी आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ न देता गावच्या विकासासाठी सदैव प्रयत्न करेन अशी प्रतिक्रिया यावेळी नवनिर्वाचित सरपंच पार्वताबाई चव्हाण यांनी दिली आहे.



## नांदुर - मधमेश्वर जलद गती कालव्यातून सोडले पाण्याचे आवर्तन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** गंगापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार रमेश बोरनारे यांनी पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्याकडे लेखी पाठपुरावा करून नांदूर मधमेश्वर कालव्यातून पिण्याच्या पाण्याचे आवर्तन सोडण्याची मागणी केली होती. या मागणीस यश मिळाले असून काल सकाळी हे पाणी सोडण्यात आले. वैजापूर व गंगापूर या दोन तालुक्यांना सिंचन व पिण्याच्या पाण्यासाठी हे आवर्तन अतिशय उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणाऱ्या गावांची तहान भागणार आहे. चारशे क्युसेक विसर्गाने सुरुवातीला कालव्यात पाणी सोडण्यात आले असून टप्प्याटप्प्याने ८०० क्युसेकपर्यंत पाण्याचा विसर्ग वाढवण्यात येणार आहे. या आधी मार्च महिन्यात सिंचनासाठी पाण्याचे आवर्तन सोडण्यात आले होते. साधारणपणे १८ ते २१ दिवस पाण्याचे आवर्तन सुरु राहणार आहे. बुधवारी सायंकाळपर्यंत बेलगाव येथे वैजापुरच्या हद्दीत हे पाणी पोहचणार असून त्यानंतर रोठी, नगिनापिंपळगाव, फकिराबादवाडी, कापुसवाडगाव, नादी, विरगाव, सटाणा, म्हस्की, हनुमंतगाव, जातेगाव, कऊटगाव, वरखेड मार्गे गंगापूर तालुक्यात दाखल होईल. गंगापूर तालुक्यात साधारणपणे आठ दिवस वितरिका सुरु राहणार असुन त्यानंतर वैजापूर व गंगापूर तालुक्यात कालव्याचे पाणी वितरित करण्यात येईल.या आवर्तनामुळे लाभक्षेत्रातील शेतकर्यांना दिलासा मिळाला आहे.

## चंद्रपुरात तीव्र पाणी टंचाई

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** उन्हाळ्यात चंद्रपूरकर भीषण पाणी टंचाईचा सामना करत आहेत. पाण्यासाठी दाही दिशा भटकंती करावी लागत आहे. शहरात १२ टँकरने पाणी पुरवठा सुरू आहे. अशातच वॉल लीक झाल्याने १२ लाख लिटर पिण्याचे पाणी वाहून गेले. पाण्याच्या टाकीच्या आवारात, रस्तावर सर्वत्र पाणीच पाणी होते. शहरातील प्रियदर्शनी चौक संकुलात असलेल्या पाण्याच्या टाकीच्या गळती लागल्याने लाखो लिटर पाणी वाहून गेले. त्यामुळे मंगळवारी सायंकाळ पासून रात्री दहा वाजेपर्यंत पाण्याच्या टाकीच्या आवारातील रस्त्यावर पाणी साचलेले दिसून येत होते. महापालिकेच्या पथकाकडून दुरुस्तीचे काम सुरू होते. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार १२ लाख लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाकीच्या वॉलला गळती लागली आहे. त्यामुळे दुपारपासून पाणी वाहू लागले.

योग्य देखभालीअभावी अशा घटना घडत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे बुधवारी काही भागात पाणीपुरवठा ठप्प होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याविषयी महापालिकेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, वॉल लीक झाला आहे. रात्रीपर्यंत त्याची दुरुस्ती केली जाईल. पाणीपुरवठ्यावर कोणताही परिणाम होणार नसल्याचा दावाही त्यांनी केला. मात्र १२ लाख लिटर पिण्याचे पाणी वाहून गेल्याने महापालिकेच्या अधिकारी व पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी यांच्या बेजबाबदार पणा यातून दिसून आला.



# डोक्यात बियरची बाटली फोडल्याने तरुण गंभीर जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भर रस्त्यावर बिअरची बाटली हातात घेऊन दहशत मजविनाऱ्या सराईत गुन्हेगाराने 26 वर्षीय तरूणाच्या डोक्यात बियरची बाटली फोडून गंभीर जखमी करुन जीवे मारण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर साथीदारांच्या मदतीने फुटलेली बाटली तरूणाच्या पोटात खुपसण्याचा प्रयत्न केला. अबरार शेख (रा. बर्डी मस्जिद वैजापूर) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून वैजापूर पोलिसांनी दिनेश शिंदे, हरिष ऊर्फ हरी प्रकाश गायकवाड, अर्जुन राजपूत आणि एका अनोळखी व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल केला. हा प्रकार वैजापूर- गंगापूर रोड वरील रिलायन्स पंपाच्या शेजारी असलेल्या दातार इलेक्ट्रिक समोर रात्री 8 वाजे च्या सुमारास घडला. या बाबत अधिक महिती अशी की, अपघात झाल्याने बघण्यासाठी थांबलेल्या भावाला शिवीगाळ करणाऱ्यांना जाब विचारल्याचा राग मनात धरून बिअरची बाटली डोक्यात फोडून मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी वैजापूर पोलिसांत चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अबरार शेख (रा. बर्डी मस्जिद) असे या घटनेतील जखमी तरुणाचे नाव असून दिनेश शिंदे (रा. रोटेगाव) हरीश उर्फ हरी प्रकाश गायकवाड, अर्जुन राजपूत (दोघेही रा. गायकवाड वाडी) व एक अनोळखी इसम असे मारहाण करणाऱ्या आरोपींची नावे आहेत. अबरार हा आपल्या वडिलांसोबत मुस्तफा




पार्क येथे गॅरेजवर काम करतो व त्याचा लहान भाऊ मोहम्मद फैज हा गंगापूर रोड वरील रिलायन्स पेट्रोल पंप शेजारी दातार इलेक्ट्रिक या चारचाकी गाड्यांच्या गॅरेजमध्ये काम करतो. अबरार हा सोमवारी दि.८ रोजी सायंकाळी त्याचा भाऊ काम करत असलेल्या दातार इलेक्ट्रिक या दुकानावर दुकानावर गाडीच्या कामासाठी साहित्य आणण्यासाठी जात असताना त्याचा भाऊ काम करत असलेल्या दुकानाच्या समोरच अपघात झाला. त्यामुळे त्याचा लहान भाऊ फैज हा त्या ठिकाणी अपघात बघण्यासाठी गेला असता त्याला त्याठिकाणी चार अनोळखी व्यक्ती शिवीगाळ करत होते. ही बाब अबरारने बघितली व त्याने माझ्या भावाला शिवीगाळ का करतात असा जाब त्याने चौघांना विचारला, ज्याचा राग मनात धरत चौघांपैकी एकाने अवरारच्या डोक्यात विअरची बॉटल मारून त्याचे डोके फोडले. व मारहाण करण्यास सुरवात केली.

ही बाब दातार इलेक्ट्रिकचे मालक सय्यद इरफान मुश्ताक यांनी अबरारचे वडील रियाजोद्दीन यांना फोन करून सांगितली. त्यांनी घटनास्थळी धाव घेत भांडण सोडवण्याचा प्रयत्न केला, भांडण सोडवत असताना त्यातील एकाने फोडलेली बाटली ही अबरारच्या पोटात मारण्याचा प्रयत्न केला. मात्र रियाजोद्दीन यांनी त्याला मागे ओढल्याने अनर्थ टळला. यानंतर चारही इसम त्यांना जीवे मारण्याची धमकी देत निघून घेतले. अबरार याला या मारहाणीत गंभीर दुखापत झाल्याने त्याला प्रथम वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार करून अधिक उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात हलवण्यात आले. या प्रकरणी अवरारचे वडील रियाजोद्दीन शेख यांनी दिलेल्या तक्रारीवरून वैजापूर पोलिसांत चौघांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणातील हरीश गायकवाड या एका आरोपीस अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्याला एका दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# राष्ट्रवादी मोदींची बी टीम असल्याचा प्रश्न पवारांना झोंबला : पृथ्वीराज चव्हाण

## शरद पवारांच्या टीकेवर प्रत्युत्तर

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रवादी काँग्रेस भाजपाची बी टीम आहे का हा प्रश्न शरद पवारांना झोंबल्यामुळे त्यांनी माझ्यावर टिका केली.असे प्रत्युत्तर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी दिले. महाविकास आघाडीदरम्यान होत असलेल्या वादानंतर शरद पवार यांनी आपले सहकारी घटक पक्षातील नेते संजय राऊत आणि पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर टिका केली. या संदर्भात पृथ्वीराज चव्हाण व विधान परिषदेतील विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे या दोन्ही नेत्यांनी आधुनिक केसरी शी संवाद साधला.

माजी पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, मी कर्नाटक मधे निवडणूक प्रचारा दरम्यान गेलो असता त्या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेसने काँग्रेसच्या विरोधात उमेदवार उभा केला. त्यावेळी मी म्हणालो की, महाराष्ट्रात एनसीपी आमच्या सोबंत आहे. केंद्रातही एनसीपी आमच्या सोबंत आहे. मग कर्नाटक निवडणूकीत एनसीपी ने जी भूमीका घेतली. त्यावरुन एनसीपी मोदींची ची बी टीम आहे का असा प्रश्न मी विचारला हा प्रश्न शरद पवारांना चांगलाच झोंबल्यामुळे त्यांनी माझ्यावर टिका केली. देशातला कितीही मोठा नेता असो किंवा पक्ष असो तो जर जातीयवादी पक्षाला मदत करत असेल तर मविआ च्या धोरणानुसार मी बोललो ते योग्य असल्याचे चव्हाण म्हणाले. तर अंबादास दानवे यांनी गुळमुळीत उत्तर देऊन विषय संपवला ते म्हणाले की, शरद पवार महाविकास आघाडीचो जेष्ठ नेते आहेत. त्यांनी आघाडीतील नेत्यांना रागावले तर मिडीयावाले म्हणतात मविआ मधे वाद सुरु हे योग्य नाही.



# खुलताबाद तालुका मौजे खांडी पिंपळगाव येथे वीर शिरोमणी महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** मौजे खांडी पिंपळगाव येथे मेवाडचे सम्राट महान योद्धा महाराणा प्रताप यांची जयंती उत्साह साजरी करण्यात आली. यावेळी खुलताबाद पंचायत समितीचे माजी उपसभापती दिनेश अंभोरे व भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे यांच्या हस्ते महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे तालुकाप्रमुख प्रकाश वाकळे, रिपाई तालुका अध्यक्ष फकीरराव भालेराव, भारतीय जनता पार्टीची युवा कार्यकर्ते अविनाश वेताळ, भारतीय जनता पार्टीची युवा कार्यकर्ते भागचंद जोनवळ, भारतीय जनता पार्टीची युवा कार्यकर्ते प्रेमसिंग जोनवळ, सरपंच सज्जनसिंग झाला, माजी सरपंच अशोक उबाळे, मिठू महालकर, सोसायटी संचालक अशोक महालकर, सोसायटी माजी संचालक बबन भालेराव, पोलीस पाटील जनार्दन उबाळे, महाराणा प्रताप मित्र मंडळ अध्यक्ष, साहेबसिंग जोनवळ, उपाध्यक्ष महाजन जोनवळ, दिलीप महालकर, बळीराम महालकर, भारत कोकणे, विजय श्रीखंडे, सचिन महालकर, भाऊसाहेब श्रीखंडे, राम महालकर, बाळू श्रीखंडे, प्रमोद महालकर, दैनसिंग जोनवळ, ताराचंद जोनवळ, फारुख सय्यद, निसार सय्यद, महाजन जोनवळ आदी उपस्थित होते.




# विठू माऊली प्रतिष्ठान खैरकावाडी, ता. मुखेडचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**मुखेड :** विठूमाऊली बहुउद्देशीय प्रतिष्ठान खैरकावाडी (गोकुळवाडी) ता. मुखेड, जि.नांदेडचे विविध क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले आहेत. यात प्राचार्य डॉ. धोंडिराम संभाजी वाडकर (वै. राष्ट्रसंत वटेमोड महाराज जीवन गौरव पुरस्कार), प्रा.डॉ. रामकृष्ण बदने ( मातृ गौरव पुरस्कार ) शिवाजी कोनापुरे ( आचार्य बाळशास्त्री जांभेकर दर्पण पुरस्कार) विठ्ठल रावीकर गुरुजी (गुरु गौरव पुरस्कार) प्रा.शुभांगी दत्तात्रय पारेकर (क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार )प्रा.डॉ.पुरूषोत्तम जुन्ने (स्वामी विवेकानंद ज्ञानरत्न पुरस्कार )प्रा.अविनाश तुकाराम तलवारे ( क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार ) ह. भ.प. पांडुरंग शास्त्री होकर्णेकर (कै. गणपतराव विठ्ठोबा वाडीकर यांच्या स्मरणार्थ वाडीकर कृषी भूषण पुरस्कार ) सौ.सरूबाई शिवाजी मोरे (कै.गंगाबाई मोगलाजी बरसमवाड यांच्या स्मरणार्थ गंगामाता पुरस्कार) व शेलार पोपट धर्मनाथ, डॉ. दिनानाथ ऐतलवाड, पांडुरंग नारायण पाळेकर( सकीनवार), बाबूराव विठ्ठलराव निमनवाड, सचिन दशरथ आयतलवाड ( गुणवंत कर्मचारी पुरस्कार) वरील पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. सदरील पुरस्कार दि.१४ मे २०२३ रोजी जागतिक मातृगौरव दिनी जागतिक आरोग्य संघटनेचे सदस्य मा.डॉ.दिलीप पुंडे यांच्या हस्ते सकाळी ठीक ९.४५ वाजता मौजे खैरकावाडी (गोकुळवाडी) ता. मुखेड येथे प्रदान करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नामदेवराव आयलवाड, मा. संजय आउलवाड, ज्ञानेश्वर डोईजड, सरुबाई शिवाजी मोरे, अनिल कांबळे सलगरकर हे उपस्थित राहणार आहेत. याच दिवशी पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलन ही पार पडणार आहे. या संमेलनाचे अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ.धोंडिराम वाडकर हे असणार असून स्वागत अध्यक्ष म्हणून प्रा.डॉ. पुरुषोत्तम जुन्ने असणार आहेत.संमेलनाचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी कैलास होनधरणे हे करणार आहेत. यातच पुरस्कार वितरण होणार आहे.तसेच प्रा. विठ्ठल बरसमवाड यांच्या मातोश्री श्रीमती लक्ष्मीबाई गणपतराव बरसमवाड यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांची ज्ञानेश्वरी ग्रंथ तुला करण्यात येणार आहे. विठू माऊली या नूतन वास्तूचा गृहप्रवेश सोहळा ही संपन्न होणार आहे. या साहित्य संमेलनात साहित्यिक प्रा. विठ्ठल बरसमवाड यांच्या मराठी ज्ञानपीठाचे मानकरी व सारथी सुविचार संग्रह १००८ या दोन ग्रंथांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे. तरी पुरस्कार वितरण व एक दिवशीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमास मुखेड व परिसरातील साहित्य प्रेमींनी उपस्थिती लावावी असे आवाहन विठू माऊली बहुउद्देशीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.विठ्ठल बरसमवाड, उपाध्यक्ष मोगलाजी गणपतराव बरसमवाड, सचिव सौ. कल्याणी विठ्ठल बरसमवाड व सर्व सदस्यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.





# साहित्य सेवा प्रज्ञा मंचचे ८ वे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**सातारा :** साहित्य सेवा प्रज्ञा मंच आयोजित ८ वे राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन, दिनांक ५ मे २०२३ रोजी वेदभवन कार्यालय सातारा येथे कवयित्री सौ. विनिता कदम यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या दिमाखात पार पडले. यासाठी साहित्य सेवा प्रज्ञा मंचच्या संस्थापिका ज्येष्ठ कवयित्री सौ.लीनाताई देगलूरकर यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सर्व समिती सदस्य डॉ.सुधाकर बेंद्रे, बंधूराज सुनिल ससाणे, सौ. भावना काळे, कल्पना शिंदे, स्नेहलता काळे, मीना राजपूत यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सकाळी ८ वाजता पारंपरिक वाद्यांच्या गजरात ग्रंथदिंडी काढण्यात आली. याप्रसंगी संमेलनाध्यक्षा सौ. विनिता कदम यांनी पालखीला खांदा देऊन दिंडीची सुरूवात केली. संस्थापिका लीनाताई देगलूरकर, संमेलनाध्यक्षा विनिता कदम, स्वागताध्यक्षा डॉ. मंदा घोरपडे, प्रमुख अतिथी डॉ. मंगल जाधव, डॉ. सुभाष कटकदौंड, प्रा. डॉ. चंदना लोखंडे, बापू दासरी, विवेक जोशी, इत्यादी मान्यवरांनी व्यासपीठाची शोभा वाढवली. यानंतर वेदभवन मधील विद्यार्थ्यांनी केलेल्या पवित्र मंत्रोच्चाराच्या जयघोषात प्रसन्न वातावरणात संमेलनाध्यक्षा तसेच प्रमुख अतिथींच्या हस्ते सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलन केले गेले. त्यानंतर ९ ते १० यावेळेत सारस्वतांनी नाश्त्याचा आस्वाद घेतला. बरोबर १० वाजता प्रथम सत्राच्या सुत्रसंचालनाची जबाबदारी किरण वेताळ यांनी स्विकारली. प्रथम कवयित्री लीनाताई देगलूरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर आयोजक डॉ.सुधाकर बेंद्रे यांनी आपल्या मनोगतात लीनाताईंना स्वयं प्रकाशित चिंतामणी अशी उपाधी दिली. तसेच उदघाटक मिश्रांनी आपले मनोगत व्यक्त केले. आणि नंतर संमेलनाध्यक्षा सौ. विनिता कदम यांनी आपले अनमोल मनोगत व्यक्त केले. यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात साहित्य व त्याची समाजाला असणारी गरज , साहित्य संमेलनाचा उद्देश, महत्त्व तसेच समाज परिवर्तन काळाची गरज या महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकला. दरम्यान या संमेलनाचे खास वैशिष्ट्य असे होते की सपत्नीक कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या जोडप्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच वर्षभर संस्थेसाठी निस्वार्थी सेवा देणारे कवी कवयित्री यांचा संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला. याप्रसंगी स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले. इथे प्रथम सत्र संपले . १ ते २ यावेळेत सर्वांनी स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेतला. त्यानंतर पुन्हा संमेलनाचे दुसरे सत्र सुरू झाले. यावेळी दुसऱ्या सत्राचे सुत्र संचालनाची जबाबदारी कर्नल शरदचंद्र पाटील यांनी स्वीकारली. तेव्हा काव्यवाचनाचा कार्यक्रम सुरू झाला. यासाठी प्रमोद सूर्यवंशी, भाग्यश्री खुटाळे, बालकवी कादंबरी गायकवाड, कवी अनिल देशपांडे , पल्लवी उमरे, विनिता कदम, सुधाकर बेंद्रे, अशा अनेक नामवंत कवींनी हजेरी लावली. त्याचवेळी काव्यस्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे परीक्षण लेखक कवी सन्माननीय श्री. चंद्रहास शेजवळकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. यावेळी विविध विषयांवर सारस्वतांनी आपल्या कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या शेवटी गझलांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी गझलसम्राट डॉ. राज रणधीर, डॉ. राजेंद्र केंगार, डॉ. सुभाष कटकदौंड, किरण वेताळ, कर्नल शरदचंद्र पाटील, लीनाताई देगलूरकर अशा अनेक गझलकारांनी गझल्स सादर करुन कार्यक्रम रंजक बनवला. यानंतर काव्यस्पर्धेत विजयी झालेल्या ३ स्पर्धकांना रोख रकमेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. माणिक जाधव आणि डॉ.सुधाकर बेंद्रे यांनी तरुणांना लाजवेल असे उत्कृष्ट नियोजन केले होते. त्यांची कार्याबद्दलची आत्मीयता आणि समर्पकता वाखाणण्याजोगी होती. संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या सारस्वतांनी कार्यक्रमांची रंगत वाढवली. त्यामुळे पृथ्वीवर त्या दिवसापुरते स्वर्गीय सुखाचा सोहळा थाटामाटात पार पडला.

# अविनाश आवधुतवार यांना शिक्षक आयकॉन पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** तालुक्यातील किवळा येथील जि.प.प्रा शाळेचे उपक्रमशील शिक्षक अविनाश नारायणराव आवधुतवार यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, जिल्हा शाखा नांदेड यांच्या वतीने दिला जाणारा जिल्हास्तरीय शिक्षक आयकॉन पुरस्कार -2023 मानकरी ठरले आहेत. अतिशय महत्त्वाचा व प्रतिष्ठेचा मानला जाणारा शिक्षक आयकॉन पुरस्कार वितरण सोहळा दि.३ मे २०२३ रोजी कुसुम सभागृह नांदेड येथे पार पडला. यावेळी माजी मंत्री डि.पी. सावंत, आमदार बालाजीराव कल्याणकर, ओमप्रकाश पोकर्णा साहेब , म.रा.प्रा. शिक्षक संघाचे राज्य नेते संभाजीराव थोरात( तात्या ), राज्य अध्यक्ष आंबादास वाजे कोषाध्यक्ष वायाळ, महिला राज्याध्यक्षा डॉ.स्वाती शिंदे अनेक मान्यवर मंडळींची उपस्थिती होती.

लोहा तालुक्यातील पारडी, जि.प. हा. माळाकोळी, पांगरा, जि.प.हा बाचोटी व किवळा येथे उपक्रमशिल शिक्षक अविनाश नारायणराव आवधुतवार सातत्याने विविध उपक्रम राबवून व विविध स्पर्धापरीक्षेत विद्यार्थ्यांना यश मिळवून देण्याचे कार्य करत आहेत. त्यांच्या रूपाने एका आदर्श शिक्षकाचा सन्मान झाला असून जि.प.प्रा.शा.किवळा सह लोहा तालुक्यासाठी गौरवाची बाब आहे. सदरील पुरस्काराबद्दल शाळेचे मु.अ,शा.व्यस. अध्यक्ष, सदस्य, पालक, शिक्षक, नागरिक यांनी व मित्र मंडळीने अभिनंदन केले.



# आ. सतीश चव्हाणांकडून १० लाखांचा निधी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** आमदार सतीश चव्हाण यांच्या निधीतून खुलताबाद शहरांमध्ये प्रभाग क्रमांक ६ मध्ये १० लाख रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आली यामध्ये विविध कामे करण्यात येत आहे. सिमेंट रस्त्याचे उद्घाटन गजानन फुलारे यांच्या हस्ते करण्यात आले गजानन फुलारे यांनी खूप पाठपुरावा केला होता त्यांच्या पाठपुरावाला यश येऊन १० लक्ष आमदार सतीश चव्हाण यांच्या निधीतून देण्यात आली यावेळी गजानन पाटील फुलारे राहुल जगताप गोकुळ लिंगायत रवींद्र पाटील विनोद फुलारे राहुल जगताप मुकेश लिंगायत पप्पू हजारे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



# अंबड तालुक्यातील खडकेश्वर येथे गाळमुक्त तळे, गाळयुक्त शिवार योजनेस प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**अंबड :** तालुक्यातील खडकेश्वर येथे गाळमुक्त तळे गाळयुक्त शिवार या महत्वाकांक्षी योजने अंतर्गत ताडहदगाव शिवारातील खडकेश्वर येथील प्रकल्प तळ्यातील असणारा गाळ काढण्याच्या कामाला जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, जिल्हा जलसंधारण अधिकारी राजू झुरावत, केअरींग फाऊंडेशन मुंबईचे निमेशभाई, ए.पी. चंद्रा फाऊंडेशनचे अमितभाई, अमृता दीदी, सुजयभाई, नुतन दीदी देसाई, सुनीलभाई रायठ्ठा, तहसिलदार चंद्रकांत शेळके यांच्या उपस्थितीत सुरुवात झाली. यावेळी ताड हादगाव येथील सरपंच शारदा प्रकाश वाघमारे, उपसरपंच परमेश्वर रावसाहेब वाघुंडे, मंडळ अधिकारी माणिकराव भोंगाणे, तलाठी संजय पालवे, ग्रामसेवक वसंत नागरगोजे, द्वारकादास कोल्हे, नारायण जामकर, कृष्णा वाघुंडे, संजय वाघुंडे, बाप्पुराव हरीश्चंद्रे परिसरातील शेतकरी, जलक्रांती करिता प्रयत्न करणारे स्वयंसेवक, सामाजिक कार्यकर्त्यांच्या प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ विजय राठोड यांनी उपस्थित सर्व शेतकऱ्यांचे कौतुक करुन जिल्ह्यात गाळमुक्त तळे गाळयुक्त शिवार या महत्वाकांक्षी योजने अंतर्गत जास्तीत जास्त शेतकऱ्यांना गाळ उपलब्ध करून देण्याचा आपला माणसं असल्याचे सांगितले. त्यासाठी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपली तयारी दर्शवावी. जेसीबी मशीन अथवा इतर काही मदत लागल्यास ती ताबडतोब पुरविण्यात येईल असे आश्वासन देखील उपस्थित शेतकऱ्यांना दिले. जिल्हाधिकारी डॉ. राठोड यांनी जवळच असलेल्या पांगरखेडा येथील गायरान जमिनीस भेट दिली. या ठिकाणी 17 एकर जागेवर लोकसहभागातून तार कंपाऊंड करण्यात आलेले आहे. येथील गावकऱ्यांनी याठिकाणी गर्द असे वृक्षारोपण करण्याचा मानस व्यक्त केला.

> आपल्या जमिनीची सुपीकता वाढवायची असल्यास खडकेश्वर सह शेजारच्या चार ते पाच गावातील शेतकऱ्यांनी या संधीचा फायदा घेऊन जास्तीत जास्त गाळ आपल्या शेतात घेऊन जावा आणि आपल्या शेतीची सुपीकता वाढविण्यावर भर द्यावा .
> **-चंद्रकांत शेळके, तहसीलदार, अंबड**



गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिति अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर